सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १६६ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. २६ जुलै २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## डोनाल्ड ट्रम्प यांच्यापेक्षा मोदी जास्त लोकशाहीवादी टॉप लीडर्स रेटिंगमध्ये पहिल्या पाचात वर्णी, ट्रम्प बाहेर!

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६नवी दिल्ली**

पंतप्रधआन नरेंद्र मोदी हे पुन्हा जगातील सर्वात प्रसिद्ध नेते ठरले आहेत. नुकत्याच प्रसिद्ध करण्यात आलेल्या जागतिक यादीत 'डेमोक्रॅटिक लीडर अप्रुव्हल रेटिंग्ज'मध्ये पंतप्रधान मोदी यांनी ७५ टक्के अप्रुव्हल स्कोरसह अव्वल स्थान पटकावले आहे. अमेरिकेतील बिझनेस इंटेलिजेंस फर्म मॉर्निंग कन्सल्टने ही आकडेवारी जारी केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यानंतर दक्षिण कोरियाचे अध्यक्ष ली जे म्युंग यांनी ५९ टक्के अप्रुव्हल स्कोअरसह दुसरे स्थान पटकावले आहे.

विशेष बाब म्हणजे, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे या यादीत पहिल्या पाचमध्ये देखील नाहीत. ट्रम्प यांना ४५ टक्के अप्रुव्हलसह आठवे स्थान मिळाले आहे.

नुकतेच प्रसिद्ध करण्यात आलेली 'ग्लोबल लीडर अप्रुव्हल रेटींग' ४ ते १० जुलै २०२५ या कालावधीत घेण्यात आलेली आहे. सर्वेक्षण घेतलेल्या वेगवेगळ्या देशांमधील पौढ व्यक्तींनी दिलेल्या मतांची सात दिवसांची सरासरी मॉर्निंग कन्सल्टने वापरली असल्याचे म्हटले आहे.

मॉर्निंग कन्सल्ट ही अमेरिकेतील बिझनेस इंटेलिजन्स अँड डेटा अनालिटिक्स कंपनी आहे. जागतिक नेत्यांची विशेषतः



लोकशाही असलेल्या देशांमधील, पब्लिक अप्रुव्हल रेटिंग या कंपनीकडून मोजली जाते. वेगवेगळ्या देशांमधील हजारो लोकांच्या दैनंदिन मुलाखतींच्या माय्मातून ही रेटिंग दिली जाते.

या सर्वेमध्ये आढळून आले की, सर्व्हेक्षणात सहभागी झालेल्या प्रत्येक चार पैकी तीन लोक हे मोदी डेमोक्रॅटिक नेते असल्याबद्दल सकारात्मक होते. तर १८ टक्के लोकांचा गटाची तशी भावना नव्हती, तर ७ टक्के लोकांचे मत स्पष्ट नव्हते किंवा त्यांना याबद्दल खात्री नव्हती.

दक्षिण कोरियाचे राष्ट्राध्यक्ष ली जे म्युंग हे जगातील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात लोकप्रिय डेमोक्रॅटिक नेते ठरले आहेत. दरम्यान सर्वेक्षणात सहभागी झालेल्यांपैकी ५९ टक्के लोकांनी त्यांना पसंती दिली. २९ टक्के लोकांनी त्यांचे नेतृत्व नाकारले, तर सुमारे १३ टक्के लोकांना त्यांच्याबद्दल खात्री नव्हती. या यादीत त्यांना दुसरे स्थान मिळाल्याबद्दल आश्चर्य व्यक्त होत आहे, कारण राष्ट्राध्यक्ष पदाव येऊन त्यांना फक्त एक महिना झाला आहे.

### ट्रम्प यांचा आठवा क्रमांक

गेल्या वर्षी विजय मिळवून अमेरिकेत सत्तेत आलेल्या डोनाल्ड ट्रम्प यांना या यादीत आठव्या स्थानावर समाधान मानावे लागले आहे. फक्त ४४ टक्के लोकांनी त्यांच्या नेतृत्वाला मान्यता दिली आहे. तज्ज्ञांच्या मते त्यांची धोरणे जसे की ट्रेड टॅरिफ आणि अंतर्गत निर्णय यामुळे त्यांच्या लोकप्रियेतेला तडा गेला असू शकतो.

### हे आहेत टॉप पाच जागतीक नेते

१) नरेंद्र मोदी (भारत) - ७५ टक्के अप्रुव्हल
२) ली जे-म्युंग (दक्षिण कोरिया) - ५९ टक्के अप्रुव्हल
३) जेवियर मिलेई (अर्जेंटिना) - ५७ टक्के अप्रुव्हल
४) मार्क कार्नी (कॅनडा) - ५६ टक्के अप्रुव्हल
५) अँथनी अल्बानिज - ५४ टक्के अप्रुव्हल

## सरकारमधील मंत्र्यांवर मुख्यमंत्री फडणवीस नाराज

### अनेकांना डच्चू मिळणार?, खा. सुळेंचा दावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६मुंबई**

महायुती सरकारमधील मंत्र्यांचे अनेक कारनामे सध्या बाहेर येत आहेत. त्यामुळे सरकारच्या कारभारावर प्रचंड टीका होत आहे. विरोधकांकडूनही या मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी सातत्याने केली जात आहे. या घडामोडी घडत असतानाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दिल्लीला गेले होते. येथे त्यांनी अनेकांच्या भेटी घेतल्या. त्यांच्या या दौऱ्याचा तपशील बाहेर आलेला नसला तरी शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी वेगळाच सूर आळवला आहे. मुख्यमंत्री त्यांच्या सरकारमधील मित्रपक्षांवर नाराज आहेत, असे सुळे म्हणाल्या आहेत.



सुळे यांनी आज प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी विविध मुद्द्यांवर मत व्यक्त केली. तसेच राज्याच्या राजकारणात सध्या ज्या घडामोडी घडत आहेत त्यावरुन सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. दिल्लीत राज्याबद्दल अनेक चर्चा सुरू आहेत मुख्यमंत्री तीन दिवस दिल्लीत होते. मंत्रिमंडळाच्या मंत्र्यांकडून जे सुरू आहे त्यावर मुख्यमंत्री प्रचंड नाराज आहेत. मित्रपक्षांवर मुख्यमंत्री नाराज आहे. महाराष्ट्राची प्रतिमा वाईट होईल अशी परिस्थिती सध्या आहे, अशी टीका सुळे यांनी केली.

## नरेंद्र मोदी मोठी समस्या नाही, मी दोनवेळा भेटलो, माध्यमांनी खूप महत्व... राहुल गांधींचा हल्लाबोल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ नवी दिल्ली**

संसदेचे पावसाळी अधिवेशन सुरू आहे. सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. दरम्यान, काल २५ जुलै रोजी दिल्लीत झालेल्या 'ओबीसी पार्टनरशिप जस्टिस कॉन्फरन्स'मध्ये कॉंग्रेस नेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर निशाणा साधला.

यावेळी राहुल गांधी यांनी राजकारणातील खरी समस्या काय आहे हे माहित आहे का? असा सवाल केला. यावर एका व्यक्तीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नाव घेऊन उत्तर दिले. यावर बोलताना राहुल गांधी म्हणाले, नरेंद्र मोदी हे मोठी समस्या नाहीत. माध्यमांनी त्यांना फक्त वर चढवून ठेवले आहे. मी त्यांना दोनवेळा भेटलो आहे, त्यांच्यासोबत एका खोलीत बसलो आहे. हा फक्त एक दिखावा आहे, त्यात काहीही तथ्य नाही, अशी टीका राहुल गांधी यांनी केली.

नरेंद्र मोदी 'हिंदू भारत' म्हणतात, तर ५० टक्के हिंदू ओबीसी आहेत. जर ते हिंदू भारत आहे तर मीडिया आणि कॉर्पोरेट क्षेत्रात ओबीसी का नाहीत, मोठ्या नेत्यांच्या यादीत ओबीसी का नाहीत?, असा सवाल मोदींनी केला.

त्यांच्या व्यवस्थेत ओबीसी का




नाहीत. म्हणूनच आम्ही म्हटले आहे की जिथे कॉंग्रेसचे सरकार असेल तिथे आम्ही जातीय जनगणना करू, जेणेकरून आम्हाला कळेल की देशात ओबीसी वर्गातील लोकांचा किती सहभाग आणि वाटा आहे, असंही राहुल गांधी म्हणाले.

राहुल गांधी म्हणाले की, तुम्ही माझ्या बहिणी प्रियांका यांना विचारा की, जर राहुल यांनी काही काम करायचे ठरवले असेल तर ते काम करतील की नाही? मी ते सोडणार नाही. जातीय जनगणना हे माझे पहिले पाऊल आहे, माझे ध्येय आहे की तुमच्या कामाला भारतात आदर आणि सहभाग मिळावा.

## राजकीय साडेसाती दूर होण्यासाठी माणिकराव कोकाटे यांचे शनिदेवाला साकडे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६शनी शिंगणापूर**

सध्या रमी प्रकरणामुळे राजकीय कारकिर्दीला लागलेले ग्रहण दूर होण्यासाठी कृषिमंत्री माणिकराव कोकाटे आता शनिचरणी लीन झाले आहेत. नंदुरबार दौऱ्यावर असलेले मंत्री कोकाटे यांनी साडेसातीमुक्तीचे शक्तीपीठ असे भाविकांमध्ये मानण्यात येणाऱ्या शनिमांडळ येथील शनिमंदिरात शनिवारी पूजा केली.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्ताने जनविश्वास सप्ताह अंतर्गत नंदुरबार तालुक्यातील शनिमांडळ गावात शनिवारी कांतालक्ष्मी चॅरिटेबल हॉस्पिटल आणि राष्ट्रवादीच्या वतीने आरोग्य शिबिराचे आयोजन



करण्यात आले होते. नंदुरबारचे पालकमंत्री असलेले कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी या शिबिरास भेट दिली. जळगाव जिल्ह्यातील चोपडा येथील नियोजित कार्यक्रम रद्द करुन धुळ्याहून कोकाटे हे शुक्रवारीच नंदुरबार येथे आले. पालकमंत्री कोकाटे हे शुक्रवारी सायंकाळी उशिरा नंदुरबार येथे येणार होते. परंतु, ते दुपारी चार वाजताच नंदुरबारमध्ये दाखल झाल्याने राष्ट्रवादीचे पदाधिकारी, कार्यकर्तेही चकित झाले.

रविवारी जिल्हा दौऱ्याला सुरुवात करण्याआधी पत्रकारांनी त्यांच्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी बोलणे टाळले. ते शनिंमांडळ येथील आरोग्य शिबिरासाठी रवाना झाले. शनिमांडळ येथे दाखल होताच त्यांनी या गावातील प्रसिध्द शनिमंदिरात जावून पूजा आणि आरती केली. कृषिमंत्रीपद स्वीकारल्यापासून कोकाटे यांच्यामागे लागलेले शुक्लकाष्ट आणि त्यात रमी चित्रफित प्रकरणाची पडलेली भर यामुळे कोकाटे हे चांगलेच अस्वस्थ आहेत. त्यांच्या कृषिमंत्रीपदाचा मंगळवारी निर्णय घेण्यात येईल, असे राष्ट्रवादीचे अध्यक्ष अजित पवार यांनी याआधीच स्पष्ट केले आहे. या पार्श्वभूमीवर, कोकाटे यांनी शनिमंदिरात जावून शनिदेवालाच साकडे घातल्याचे मानले जात आहे.

यावेळी आरोग्य शिबिराच्या व्यासपीठावरुन कोकाटे यांनी, राज्यातील सहकारी मित्रपक्ष असलेल्या शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी आपणाकडे राज्यात दुष्काळ असल्याने शेतकऱ्यांना दिलासा देण्याची गरज व्यक्त केल्याचे सांगितले. शनिमांडळच्या सरपंचांनी वळवाच्या पावसामुळे झालेल्या कांदा पिकाच्या नुकसांनीची भरपाई अद्याप मिळाली नसल्याचे निदर्शनास आणले. शनैश्वर महाराजांना दुष्काळ निवारण होवो, आपल्या सर्वांच्या आयुष्यातील साडेसाती नष्ट होवो, आपल्याला चांगले दिवस प्राप्त होवो, अशी प्रार्थना केली. तसेच आमच्यासारख्यांच्या जीवनातील संकटे दूर व्हावीत, अशी प्रार्थना केल्याचे कोकाटे यांनी मान्य केले.

राजकीय क्षेत्रातील अनेक जण संकट आल्यावर देवाकडे धाव घेत असल्याचे वारंवार दिसून आले आहे. त्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचाही समावेश आहे. या पंगतीत कोकाटे यांची भर पडली आहे.

## ...तर गुन्हा दाखल करून पैसे वसूल करा, लाडकी बहीणबद्दल बावनकुळेंचे मोठे विधान



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६नागपूर**

गेल्या काही काळात लाडकी बहीण योजनेवरून अनेकदा सत्ताधारी आणि विरोधक आमनेसामने आले आहेत. तसेच, लाडकी बहीण योजनेचा फायदा हा पुरुषही घेत असल्याचे अनेकदा तक्रारी आल्या आहेत. गेल्या काही काळात अपात्र महिलांची नावे या योजनेतून कमी करण्यात आली. त्यानंतर अनेकदा विरोधकांनी सत्ताधाऱ्यांना लक्ष्य केले आहे. याबाबत आता महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी याबाबत स्पष्ट विधान केले आहे. महिलांचे पैसे जर पुरुषांनी घेतले असेल, तर गुन्हा दाखल केला पाहिजे, पैसेही वसूल केले पाहिजे. असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

चुकीच्या पद्धतीने लाडक्या बहिणीने लाभ घेतले, त्यांच्याकडून वसुली केली जाणार नाही. हे सरकारने या आधीच स्पष्ट केले आहे. असे मंत्री बावनकुळे यांनी स्पष्ट केले आहे. राज्य सरकारकडून राबवण्यात येत असलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेवर पुरुषांनी डल्ला मारल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. त्यावर आता कारवाईची मागणी महसूलमंत्री बावनकुळे यांनी केली आहे. ते पुढे म्हणाले की, मंत्रिमंडळातील बदल करण्याचा सर्वस्वी अधिकार हा मुख्यमंत्र्यांचा आहे. शिवसेना तसेच राष्ट्रवादी कॉंग्रेस संदर्भामधील अधिकार त्या पक्षातील नेत्यांचा आहे. अंतिम निर्णय मुख्यमंत्री घेतील. पण, माझ्यासह मंत्रिमंडळातील सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे की जनतेच्या मनात लोकप्रतिनिधी बद्दल काही वाईटपणा निर्माण होईल. जनतेच्या मनात लोकप्रतिनिधी बद्दल मत खराब होतील, असे वागणे योग्य नाही. यासाठी आम्ही सर्वांनी दक्ष राहिले पाहिजे. असे त्यांनी स्पष्ट केले.

## महाराष्ट्राच्या खासदारांचा दिल्लीत डंका, सुप्रिया सुळे, श्रीरंग बारणे वर्षा गायकवाडसह ७ खासदारांना संसदरत्न पुरस्कार २०२५ जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६नवी दिल्ली**

देशातील १७ खासदारांना यंदाचा 'संसदरत्न पुरस्कार २०२५' जाहीर करण्यात आला आहे. यंदा 'संसदरत्न' पुरस्कारांसाठी महाराष्ट्राने बाजी मारली असून महाराष्ट्रातील ७ खासदारांनी या यादीत स्थान पटकावले आहे. संसदेमध्ये उल्लेखनीय, सातत्यपूर्ण आणि उत्कृष्ट कामगिरी करणार्या खासदारांना दरवर्षी 'प्राईम पॉईंट फाऊंडेशन' या संस्थेमार्फत हा पुरस्कार दिला जातो. या संसदरत्न पुरस्कारात महाराष्ट्राने




यंदाहि बाजी मारली आहे. यात सुप्रिया सुळे, श्रीरंग बारणे यांच्यासह भर्तृहरी महताब आणि एन के प्रेमचंद्रन यांना पुरस्कार जाहीर करण्यात आले आहे. यासह अरविंद सावंत, नरेश म्हस्के, स्मिता वाघ, मेधा कुलकर्णी, वर्षा गायकवाड यांनाहि संसदरत्न पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

### संसदरत्न पुरस्कारात महाराष्ट्रातील 'या' ७ खासदारांची बाजी

महाराष्ट्रातील खा. स्मिता वाघ (भाजप), मेधा कुलकर्णी (भाजप), सुप्रिया सुळे (राष्ट्रवादी कॉंग्रेस - शरद पवार गट), श्रीरंग बारणे (शिवसेना), नरेश म्हस्के (शिवसेना), अरविंद सावंत (शिवसेना- उबाठा)आणि वर्षा गायकवाड (कॉंग्रेस) या सात खासदारांचा संसदेत उत्कृष्ट कामगिरीसाठी 'संसदरत्न' पुरस्काराने गौरव करण्यात येणार आहे.

## धनंजय मुंडेंना मंत्रीपद देऊ नका; त्याआधी आम्हाला विष द्या',- करूणा शर्मा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६मुंबई**

कृषी विभागाच्या आरोपांवर धनंजय मुंडे यांना न्यायालयानं क्लिनचिट दिल्यानंतर आता उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुन्हा एकदा त्यांना मंत्रिपदी संधी देणार असल्याचे संकेत दिले आहेत. कराड प्रकरणातून मुंडेंना क्लिनचीट मिळाल्यानंतर त्या प्रकरणाशी त्यांचा संबंध नसल्याचं सिद्ध झाल्यानंतर आम्ही त्यांना पुन्हा मंत्रिपद देऊ, अशी प्रतिक्रिया अजित पवार यांनी दिली आहे. त्यावरती आता करूणा शर्मा यांनी संताप व्यक्त केला आहे. तुम्ही अशा माणसाला मंत्रीपद देऊ नका, चांगल्या माणसाला मंत्रीपद द्या असंही पुढे त्यांनी म्हटलं आहे.



### काय म्हणाल्या करूणा मुंडे?

अजितदादा तुम्ही धनंजय मुंडे यांना परत मंत्रिपद देण्याची गोष्ट करत आहात, तुम्ही लोकप्रतिनिधी आहात. पण धनंजय मुंडे लोकप्रतिनिधी नाही, ते फक्त त्यांचा विचार करतात. तुम्ही बीड जिल्ह्याचे पालकमंत्री आहात. ज्ञानेश्वरी मुंडेंचे पती महादेव मुंडेंची हत्या प्रकरणाबरोबर संतोष देशमुख हत्या प्रकरण आणखी काही प्रकरण आहेत. जी गेल्या काही सहा ते सात महिन्यांपासून समोर आली आहेत. लोकांच्या समोर सर्व आलं आहे, त्यांनी शासन प्रशासनाचा गैरवापर करून यांनी काळा कारभार आणि साम्राज्य करून ठेवलं. हे तुम्हाला दिसलं आहे. गेल्या सहा सात महिन्यापासून तुम्ही पाहत आहात. तरी पण तुम्ही अशा घाणेरड्या व्यक्तीला मंत्रीपद देण्याची गोष्ट करत आहात. तुम्हाला इकडच्या जनतेचे दुःख दिसत नाही. जनप्रतिनिधी असताना महादेव मुंडे, संतोष देशमुख हत्या प्रकरण, माझ्या मुलाबाळांच्या काय अवस्था त्यांनी करून ठेवली होती, ती इथे येऊन पहा. तुम्हाला त्या माणसाच्या विरोधातील पुरावे हवे असतील तर मी देते. मला वेळ द्या मी सर्व घेऊन येते. ते एकदा पाहा, त्यानंतर तुम्ही विचार करा. अशा घाणेरड्या व्यक्तीला जर तुम्ही परत परत मंत्रीपद देत आहात, तर ते सहन करणार नाही आणि जर त्याचे दुःख दिसत नसले तर तुम्ही ज्ञानेश्वरी मुंडेंच्या परिवाराला, संतोष देशमुखांच्या परिवाराला, करूणा शर्माच्या परिवाराला विष द्या आणि नंतर धनंजय मुंडे मंत्रीपद द्या, असे पुढे करूणा शर्मा यांनी म्हटले आहे.

## संपादकीय ......

# असामान्य शौर्याने साकारलेला कारगिल विजय!

दोन महिने, तीन आठवडे आणि दोन दिवस जगातल्या सर्वात उंचीवरच्या भूमीत कारगिलचे युद्ध लढले गेले. ३ मे ते २६ जुलै १९९९ हा तो कालावधी. या युद्धातल्या प्रत्येक दिवसाच्या स्मृती लष्करातर्फे जागविल्या जात आहेत. युद्धभूमी ते आजचे कारगिल यात भरपूर फरक आहे. देशाच्या इतिहासात पहिल्यांदाच तुमचा शत्रू तुमच्या डोक्यावर चढून वार करत होता, टायगर हिलवरच्या आपल्या चौक्या ताब्यात घेऊन पाकिस्तानने छुपा वार केला होता, गुराख्यांनी तिथे आपले लष्कर नसल्याची बातमी आणली. तोवर कारगिल–श्रीनगर रस्त्यावरून जाणार्या लष्कराच्या गाड्यांना रॉकेट लाँचवर टार्गेट केले होते. शत्रू नेमका कुठे आहे ते कळत नव्हते.१९४७, १९६५ आणि १९७१ या लढायांमध्ये काश्मीरला भारतापासून तोडण्याचे निष्फळ प्रयत्न पाकिस्तानने केले होते. पाकिस्तानचा सियाचीन हिमनद्यांचा ताबा घेण्याचा प्रयत्न भारताने निष्फळ केला होता, मात्र पाकिस्तानने हा ताबा घेतला असता, तर काराकोरम खिंडीपर्यंतचा भूभाग पाकिस्तानच्या अधिपत्याखाली आला असता. सियाचीन हिमनद्यांचा भूभाग वेगळा पाडून गिळंकृत करण्यासाठी या भूभागाच्या दक्षिणेकडील प्रदेशावर ताबा मिळवणे आणि द्रास–लेहसारख्या रस्त्यांवर स्वत:चा प्रभाव पाडून भारताच्या सामरिक हालचाली खंडित करणे, हे तंत्र सामरिकदृष्ट्या पाकिस्तानच्या फायद्याचे ठरणार होते.ऑक्टोबर १९९८ मध्ये दोन वरिष्ठांना डावलून पाकिस्तानचे पंतप्रधान नवाज शरीफ यांनी जनरल परवेझ मुशर्रफ यांना सरसेनापतीपद बहाल केले होते. मुशर्रफ आणि आयएसआय (पाकिस्तानी गुप्तहेर संघटना) या दोहोंच्या दृष्टीने काश्मीर प्रश्न प्रज्वलित राहणे आवश्यक होते. काश्मीर खोर्यातील आयएसआयच्या कारवायांना भारतीय सुरक्षा दलांनी लगाम घातल्याने एका नवीन भागात कुरापत काढण्यासाठी पाकिस्तानकडून कारगिलची निवड करण्यात आली होती.

कारगिल भागात घुसखोरी केल्याने पाकिस्तानचे दोन उद्देश साध्य होणार होते. ऑक्टोबर १९९८ ते मार्च १९९९ या कालावधीत पाकिस्तानकडून घुसखोरीची सर्व तयारी करण्यात आली त्यात सीमारेषेपर्यंत रस्त्यांची दुरुस्ती केली. खेचरांसाठी पायवाटा बनविण्यात आल्या. विविध अत्याधुनिक बंकर्स उभे करून त्यांच्यात जड शस्त्रास्त्रे, दारूगोळा, खाण्यापिण्याचे पदार्थ, बर्फातील बूट इत्यादींचा साठा करण्यात आला. दूरध्वनी यंत्रणा विकसित करण्यात आली. ताबारेषेच्या अगदी जवळच सुमारे ८ ते १० हेलिपॅड बनविण्यात आले.

पाकिस्तानकडून १९९९ च्या जानेवारी आणि फेब्रुवारीच्या सुरुवातीला प्रथम निरीक्षण पथके (रेकी पार्टी) पाठविण्यात आली. त्यानंतर मार्चमध्ये पाकिस्तान नॉर्थ लाईट इन्फंट्रीच्या पलटणीच्या तुकड्यांनी मार्च केले. रसद, दारूगोळा आणि हत्यारे पुढे आणली गेली. विविध डोंगरमाथ्यांची आणि पठारांची निवड करून त्यांवर बंकर्स उभारण्यात आले. त्यात ५० – ५५ पाकिस्तानी सैनिकांच्या तुकड्या राखीव करण्यात आल्या.मशीनगन, रॉकेट लाँचर, स्वयंचलित ग्रेनेड लाँचर, मोर्टर, विमानविरोधी तोफा आणि विमानांवर अचूक मारा करणारी अत्याधुनिक प्रक्षेपणास्त्रे ठेवण्यात आली. भूसुरुंग पेरण्यात आले. १९९८–९९ चा हिवाळा सौम्य असल्यामुळे हे काम सुकर झाले. काश्मीर स्वतंत्र करण्याच्या प्रेरणेने पेटलेल्या काश्मिरी स्वातंत्र्यसैनिकांची ही कामगिरी आहे, असे भासविण्यासाठी नॉर्थ लाईट इन्फंट्रीच्या सैनिकांना सलवार–कमीजचा पेहराव दिला गेला. वास्तविक जीनिव्हा कराराचा आणि सैनिकीमूल्यांचा हे उल्लंघन होते.

१९९८–९९ च्या सौम्य हिवाळ्यामुळे एका बाजूस पाकिस्तानची घुसखोरी सुकर झाली, तर दुसर्या बाजूस नैसर्गिक बदलानुसार जूनमध्ये बर्फ वितळण्यास सुरू होण्याऐवजी मे १९९९ मध्येच वितळल्यामुळे त्याची वाट पाहत असलेल्या येथील मेंढपाळांना काकसर आणि बटालिक यांमधील डोंगरदर्यात पाकिस्तानी सैनिक मोर्चे बांधत असलेले दिसले. ४ मे रोजी मेंढपाळांकडून ही बातमी भारतीय सैन्याला मिळाल्यावर चक्रे वेगाने फिरू लागली.

पाकिस्तानी मोर्चे मोक्याच्या जागांवर उभारलेले होते आणि ते सभोवतालच्या प्रदेशावर निरीक्षण आणि प्रभुत्वाने परिपूर्ण होते. उभे सरळ डोंगरी कडा, दुर्गम पाऊलवाटा, सात–आठ हजार फूट शत्रूच्या नजरेखाली चढून जाताना होणारी दमछाक, अंगावर जड कपडे, पाठीवर शस्त्र, दारूगोळा आणि खाण्याच्या सामानाचे अवजड वजन हे सगळे पेलत दुर्गम पर्वतराजींच्या शिखरांवर ठाण मांडून बसलेल्या पाकिस्तानी सैन्यांवर हल्ला चढविणे व सुसज्ज घुसखोरांना ताबारेषेमागे हाकलणे ही कठीण व खडतर कामगिरी होती.

# सोयाबीन, मका व कापूस पिकात वाढला हुमणीचा प्रादुर्भाव; करा हे पाच उपाय




**दि.२६विदर्भ प्रजासत्ताक–** सोयाबीन, मका व कापूस या पिकात हुमणी किडीचे प्रादुर्भाव कमी जास्त प्रमाणात आढळून आलेला आहे. तरी या किडीच्या व्यवस्थापना करिता सामूहिकरीत्या शेतकरी बंधूनी उपाययोजना कराव्यात.

**हुमणी किडीचा प्रादुर्भाव कसा ओळखावा?**

हुमणी किड ही बहुभक्षी कीड असून या किडीमुळे झाडांची पाने पिवळे पडून झाटे सुकतात, अशी झाडे आढळल्यास झाड उपटून मुळे कुर्तडलेली आहेत का ते पहावे तसेच मुळे कुर्तडलेल्या झाडाखाली दोन ते तीन इंच खोल मातीत हुमणी किडीच्या अळ्या आहेत का ते शोधावे.

**कसा कराल बंदोबस्त?–** पिकामध्ये शक्य असेल तोपर्यंत आंतरमशागत करावी, आंतरमशागत करताना शेतातील अळ्या हाताने वेचून नष्ट कराव्यात.शक्य असेल तिथे मोकाट पद्धतीने पाणी दिल्यास अळ्या गुदमरून मरतात व जमिनीच्या वर येतात. शेतातील तणांचा बंदोबस्त करावा.

मेटारायझीम अनिसोप्ली या जैविक बुरशीची ५० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पंपाचे नोझल काढून प्रादुर्भावग्रस्त पिकांच्या मुळाशी आळवणी करावी.उभ्या पिकात एका सरळ रेषेमध्ये झाडांची मर होत असल्यास आणि अशा झाडांची मुळे हुमणी फिडीने खाल्लेले असल्यास अशा ठिकाणी क्लोरोपायरीफॉस २०% प्रवाही ५० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पंपाचे नोझल काढून पिकाच्या मुळाशी आळवणी करावी (याचे लेबल क्लेम नाही)

(फीप्रोनील ४० % इमिडाक्लोरोप्रीड ४०%) हे मिश्र कीटकनाशक ५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून आळवणी करावी (लेबल क्लेम नाही)

महत्वाचे: अळया जास्त प्रमाणात दिसल्यास व लक्षणीय प्रादुर्भाव असल्यास नियंत्रणासाठी कीटकनाशकाचा वापर करावा.


शेतकरी ते थेट ग्राहक

**कामधेनु नॅचरल्स**

उत्तम आहार सर्वोत्तम जीवन

विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी

समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती

नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०


# रात्रीच्या जेवणात घ्यावा हा हलका आहार




**दि.२६ विदर्भ प्रजासत्ताक**

असं म्हणतात की, आपला आहार जसा असेल तसे आपले आरोग्य असते. त्यामुळे तज्ञमंडळी दुपारी पोटभर जेवण्यास सांगतात आणि रात्री जड अन्न खाण्यास मनाई करतात. रात्री जड अन्नपदार्थं खाल्ल्याने पचनाच्या समस्या निर्माण होऊ शकतात जसे की, गॅस, आम्लपित्त आणि पोटफुगीचा त्रास होऊ शकतो. त्यात



काहींना रात्री चटपटीत खाण्याचे क्रेव्हिंग होते. या क्रेव्हिंगमुळे जंकफूड खाल्ले जाते, जे आरोग्यासाठी हानिकारक असते. मग, निरोगी आरोग्यासाठी रात्रीचा आहार नेमका काय करावा? कोणत्या अन्नपदार्थांचा आहारात समावेश करावा, जाणून घेऊयात या प्रश्नांची उत्तरे,

**मूग डाळ सूप –**

मूग डाळीच्या सूपाचा रात्रीच्या जेवणात समावेश करावा. हे सूप पचायला सोपे असते याशिवाय यातील प्रोटिन्स पोट भरलेले ठेवते. तुम्हाला रात्री क्रेव्हिंग होत असेल तर मूग डाळ सूप नक्की प्यावे.

**भाजलेले मखाना –**

भाजलेले मखाना रात्रीच्या हलका आहारासाठी उत्तम पर्याय आहे. यात कमी कॅलरीज असतात आणि फायबरचे प्रमाण अधिक असते. फायबरमुळे पोट दिर्घकाळ भरलेले राहते. परिणामी, वजन नियंत्रणात राहते.

**फ्राय पनीर –**

दिर्घकाळ पोट भरलेले राहण्यासाठी फ्राय पनीर उत्तम पर्याय आहे. यात भरपूर प्रमाणात प्रोटिन्स असतात.

**काकडी शेंगदाणा चाट –**जर तुम्हाला रात्री काही हलकं–फुलकं खायची इच्छा होत असेल तर काकडी शेंगदाणा चाट खाऊ शकता. यात हेल्दी फॅट, फायबरचे प्रमाण अधिक असते. तसेच काकडी शरीर हायड्रेट ठेवण्यासाठी फायदेशीर ठरते.

**पोहे –** कमी तेलात बनवलेले पोहे तुम्ही रात्रीच्या जेवणात खाऊ शकता. यामुळे दिर्घकाळ भरलेले राहते.

**हळदीचे दूध –** भूक नसतानाही काही खाण्याची इच्छा होत असेल तर एक कप गरम दूधात हळद टाकून तुम्ही पिऊ शकता. यामुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढेल आणि रात्री चांगली झोप लागेल.

## उच्च व तंत्र शिक्षण मंत्री ना.श्री. चंद्रकांत पाटील यांचे हस्ते

# दहा कर्मचायांना अनुकंपा तत्वावर नियुक्ती आदेशाचे प्रदान

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६अमरावती –**

महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री ना.श्री. चंद्रकांत पाटील यांचे शुभहस्ते संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील पाच व विद्यापीठ परिक्षेत्रातील महाविद्यालयांमधील पाच असे एकूण दहा मृत झालेल्या कर्मचायांच्या वारसांना अनुकंपा तत्वावर नियुक्ती आदेश प्रदान करण्यात आले. यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, नॅकचे अध्यक्ष डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य तथा श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीचे अध्यक्ष श्री हर्षवर्धन देशमुख, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. केशव तुपे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे आदी उपस्थित होते.



**डिसेंबरपर्यंत अनुकंपा तत्वावरील सर्व भरती करणार***

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री ना.श्री. देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या सहमतीनुसार डिसेंबरपर्यंत अनुकंपा त्तवावरील सर्व नियुक्त्या पूर्णपणे करण्यात येणार असल्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री ना.श्री. चंद्रकांत पाटील यांनी यावेळी सांगितले. त्यांच्या शुभहस्ते संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील श्रीमती प्राजक्ता सुजय बंड, स्वप्नील सुनिल बनसोड, उदयन गजानन वनस्कर, अङिान राजेंद्र धोटे कु. पायल रविंद्र गुजर यांना, तर महाविद्यालयीन स्तरावर बापुराव बुटके कला वाणिज्य महाविद्यालय, दिग्रस, जि. यवतमाळचे बिलाल अहमद शरिफुर पटेल, श्री शिवाजी महाविद्यालय, अकोलाचे अक्षय जानराव आगळे, राधाबाई सारडा महाविद्यालय, अंजनगांव सूर्जीच्या श्रीमती पुजा सारडा, आर.ए. कला, वाणिज्य महाविद्यालय, वाशिमच्या कु. उर्वशी सुशिल मालपाणी व स्व. दत्तात्रय पुसदकर महाविद्यालय, नांदगांव पेठचे वेदांत अनिल डांगे यांना प्रत्यक्षपणे मंत्री महोदयांच्या हस्ते नियुक्ती आदेश प्रदान करण्यात आले.

**विद्यापीठ संशोधित किडनी स्टोनवरील औषध मंत्री महोदयांना कुलगुरूंचे हस्ते प्रदान***

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या बायोटेक्नॉलॉजी विभागामध्ये वरीष्ठ प्राध्यापक पदावर कार्यरत डॉ. अनिता पाटील यांनी किडनी स्टोनवरील औषधाकरीता संशोधन करुन पेटेन्ट मिळविले आहे. त्या पेटेन्टचे विद्यापीठाने व्यावसायिकीकरण केले असून त्यांच्या संशोधनाचे तंत्रज्ञान ॲप्रोप्रिएट आयुर्वेदा, बुटीबोरी, नागपूर यांना दिले आहे. त्यांनी सदर संशोधनाद्वारे किडनी स्टोनवरील तयार केलेले औषध क्रश कॅम्सुल कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे हस्ते उच्च व तंत्र शिक्षण मंत्री ना.श्री. चंद्रकांत पाटील यांना प्रदान करण्यात आले. यावेळी मंत्री महोदयांनी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते व डॉ. अनिता पाटील यांचे अभिनंदन करुन विद्यापीठांतील शिक्षकांनी आपल्या पेटेन्टचे व्यावसायिकीकरणासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले. सुरुवातीला शाल, श्रीफळ, गाडगे बाबांची मूर्ती असलेले स्मृतिचिन्ह व पुष्पगुच्छ देवून कुलगुरूंनी मंत्री महोदयांचा विद्यापीठाच्यावतीने सत्कार केला.

कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी पुष्पगुच्छ देवून उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांचा विद्यापीठाच्यावतीने सत्कार केला. याप्रसंगी महाराष्ट्र विद्यापीठ कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष श्री अजय देशमुख व विद्यापीठ कर्मचारी संघांचे पदाधिकारी यांनी मंत्री महोदयांना कर्मचायांच्या मागण्यांचे निवेदन सादर केले. यावेळी उच्च शिक्षण सहसंचालक कार्यालयातील प्रशासन अधिकारी श्री रामराव राठोड व डॉ. प्रभु दवणे तसेच विद्यापीठातील उपकुलसचिव श्री मंगेश वरखेडे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी केले.–

# सोनारखेडा येथे अवैध वाळू वाहतुकीवर धडक कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६ सोनारखेडा–** भातकुली तालुक्यातील सोनारखेडा येथील नदीपात्रातून वाळूची अवैध वाहतूकप्रकरणी तहसीलदार डॉ. अजितकुमार येळे यांच्या नेतृत्वात कारवाई करत दोन जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला. तसेच ट्रॅक्टर ट्रॉलीसह वाळू असा एकूण ५ लाख ४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

तहसीलदार अजितकुमार येळे यांना सोनारखेडा परिसरात नदीपात्रातून अवैध रेती वाहतुकीची गोपनीय माहिती मिळाल्यानंतर त्यांनी तलाठी गिल, बेले व निरगुळे यांच्यासह शासकीय वाहनाने घटनास्थळी धाव घेतली. रात्री १० वाजताच्या सुमारास ते सोनारखेडा– वाठोडा मार्गे पोहोचले असता नदीपात्रातून ट्रॅक्टर ट्रॉलीतून वाळूची वाहतूक करण्यात येत असल्याचे आढळून आले.

शासकीय वाहन पाहताच ट्रॅक्टर चालकाने वाहन पळवून सोनारखेडा येथील मंदिरालगतच्या शेतात घुसवून पळ काढला. यानंतर खोलापूर पोलिसांना बोलावण्यात आले. पोलिस पाटील सुनील मातकर व अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पंचनामा करण्यात आला. दरम्यान, जुबेर खाँ उस्मान खाँ (रा. धामोरी) हा घटनास्थळी आला व हा ट्रॅक्टर त्याच्या मालकीचा असल्याचे सांगितले. मात्र, त्याच्याकडे वाहनाची कागदपत्रे नव्हती. त्याने वाहन एक महिन्यापूर्वी खरेदी केल्याचे सांगितले. हे वाहन त्याने स्वतः खोलापूर पोलिस ठाण्यात नेऊन जमा



केले.जुबेर खाँने वाहन अजय कोलवडे (रा. वाठोडा शुक्लेश्वर) याच्याकडे चालवण्यास दिल्याचेही स्पष्ट केले. त्यामुळे अजय कोलवडे व जुबेर खाँ यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास खोलापूर पोलिस करत आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब – पोर्टल /ई – पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

शनिवार दि. २६ जुलै २०२५

शहर/ग्रामिण


## संविधानाचे अभिप्रेत मूल्य टिकविण्यासाठी न्याय व्यवस्था कटिबद्ध –सरन्यायाधीश न्या. भूषण गवई



**दर्यापूर येथील न्यायालयीन इमारतीचे उद्घाटन**



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

स्वातंत्र्य, समता आणि बंधुता हे भारतीय संविधानाचे आणि लोकशाहीचे आधारस्तंभ आहेत. या संविधानाचे अभिप्रेत मूल्य टिकविण्यासाठी न्याय व्यवस्था कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांनी केले. दर्यापूर येथील न्यायमंदीर, जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय तसेच दिवाणी न्यायालय, वरिष्ठस्तर या नूतन न्यायालयीन इमारतीच्या कोनशीलेचे अनावरण आज सरन्यायाधीश न्या. भूषण गवई यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सरन्यायाधीशांनी इमारतीची पाहणी केली. या उद्घाटन सोहळ्याला खासदार बळवंत वानखडे, आमदार गजानन लवटे, मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अनिल किलोर, मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती प्रवीण पाटील, दर्यापूर बार असोसिएशनचे अध्यक्ष धर्मेंद्र आठवले, जिल्ह्याचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सुधाकर यार्लगड्डा तसेच दर्यापूर जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश सत्यवान डोके आदी यावेळी उपस्थित होते.

सरन्यायाधीश न्या. भूषण गवई म्हणाले, दर्यापूर येथील न्याय मंदीराचे उद्घाटन ही घटना माझ्यासाठी विशेष आनंदाची आहे.

मी मूळचा दारापूरचा असल्यामुळे माझ्यासाठी ही अभिमानाची व समाधानाची बाब आहे. मी या कार्यक्रमाला सरन्यायाधीश म्हणून आलो नसून एक ग्रामस्थ म्हणून आलेलो आहे. या नवीन न्यायालयीन इमारतीमुळे तसेच सुसज्ज यंत्रणेमुळे ग्रामीण भागातील नागरिकांना लवकर न्याय मिळेल. न्यायदानाचे कार्य कोणताही पूर्वग्रहदूषित भाव न बाळगता करावे लागते, म्हणून खऱ्या अर्थाने हे एक पवित्र कार्य आहे. दर्यापूर तालुक्याने आजवर अनेक नामवंत व्यक्ती दिल्या आहेत. यामुळे हा तालुका सदैव अग्रेसर राहिलेला आहे.


न्याय व्यवस्था ही लोकशाहीचा प्राण आहे. यामुळे संविधानाला आदर्श मानून न्यायदानाचे कार्य करावे. या क्षेत्रात अनुभव अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. न्यायाधीश आणि वकील यांचे संबंध सलोख्याची असावे. शासनाने अनेक महत्त्वपूर्ण कायदे लागू केले आहेत. महिला सबळीकरण कायद्यान्वये स्त्रियांना त्यांचा हक्क मिळत आहे. उत्तम न्याय व्यवस्थेमुळे आज आपला देश प्रगतीपथावर आहे.

राज्यघटनेचे मौलिक अधिकार आणि जबाबदारी याचे योग्य पालन होणे गरजेचे असल्याचे सरन्यायाधीश न्या. भूषण गवई यावेळी म्हणाले.

दर्यापूर सत्र न्यायालय कार्यक्षेत्रात दर्यापूर व अंजनगाव ही कार्यक्षेत्र येतात. या नूतन इमारतीमध्ये दर्यापूर आणि अंजनगाव येथील जिल्हा सत्र न्यायालयाची प्रकरणे (दिवाणी व फौजदारी )या न्यायालयात चालतील. २८.५४ कोटी रुपये निधी खर्चून या सुसज्ज आणि भव्य इमारतीचे बांधकाम करण्यात आले. न्यायमंदीराची इमारत चार मजली असून तळमजल्यावर पार्किंग, तीन मजल्यांवर ५ न्यायालय कक्ष, इतर विभाग व एक सभागृह आहे. प्रत्येक मजल्यावर पक्षकार व आरोपींना बसरण्याची सुविधा आहे. अद्यावत संगणक कक्ष व सर्व्हर रुम आहेत. इमारतीच्या मागील बाजूस पार्किंगमधून रॅम्पची सुविधा आहे. नवीन न्यायालयीन इमारतीमुळे परिसरातील नागरिकांना न्याय मिळण्याची प्रक्रिया अधिक सुकर होईल.कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्ह्याचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. यार्लगड्डा यांनी केले. संचालन न्यायाधीश हितेश सोनार आणि न्यायाधीश रोहिणी मनोरे यांनी केले तर आभार अतिरिक्त सत्र न्यायाधीश सत्यवान डोके यांनी मानले.

## जिल्ह्यातील २६ शिक्षकांचे आदर्श पुरस्कारासाठी प्रस्ताव

### निवड यादी आयुक्तांच्या मंजुरीकरिता पाठविणार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती** – प्राथमिक विभागाच्या १४ शिक्षकांना दिल्या जाणाऱ्या आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी २६ शिक्षकांचे प्रस्ताव शिक्षण विभागात प्राप्त झाले आहेत. शुक्रवारी या शिक्षकांच्या डायटचे प्राचार्य यांच्या अध्यक्षतेखालील समितीने मुलाखती घेतल्या असून लवकरच शिक्षकांची निवड यादी मंजुरीकरिता विभागीय आयुक्तांकडे पाठविली जाणार आहे. त्यामुळे यंदा शिक्षक दिनीच शिक्षण पुरस्काराचा मुहुर्त साधल्या जाणार असल्याची चर्चा आहे.

दरवर्षी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडून जिल्हास्तरीय आर्देश शिक्षक पुरस्कार शिक्षकांना दिल्या जातो. यामध्ये तालुका स्तरावरुन एक अशा १४ शिक्षकांची निवड केली जाते. तसेच माध्यमिक विभागाच्या एका शिक्षकांची देखील पुरस्काराकरिता निवड केली जाते. सन २०२४-२५ करिताच्या जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी २६ प्रस्ताव दाखल झाले आहेत.

प्राप्त प्रस्तावच्या अनुषंगाने वर्ग व शाळा पडताळणी व मूल्यांकनाची प्रक्रिया २२ जुलै रोजी पुर्ण करण्यात आली आहे. तर शुक्रवारी या शिक्षकांच्या विस्तार अधिकारी यांच्या समितीने घेतल्या.

या प्रक्रियेनंतर आता १४ शिक्षकांची पुरस्कारासाठी निवड केली जाणार आहे. या निवड यादीला विभागीय आयुक्त मंजुरीदेईल त्यानंतर पुरस्काराचीपुरस्काराची घोषणा शिक्षणविभागाच्यावतीने केली जाईल. त्यामुळे यंदा ५ सप्टेंबरला शिक्षक दिनी पुरस्काराचे वितरण होण्याची शक्यता आहे.

### या शिक्षकांचे प्रस्ताव दाखल

अमरावतीमधून वनिता अरुण बोरोडे, विजया रामभाऊ सोळंके, अचलपूरमधून बबिता महादेव पंडीत, डॉ. अनिल माकोडे, अंजनगावमधुन सुचिता विठ्ठल दाहिकर, काचन दादाराव भांगे, मो. अब्दुल मोबिन अब्दुल गफुर, भातकुलीत शैलेश विजय मांदळे, स्वप्नाली प्रमोद खर्चान, शीला जानराव मसराम, चांदूर रेल्वेत नंदकिशोर शंकरराव धर्मे, सय्यद रज्जाक सय्यद गफ्फार, चिखलदरात इंदिरा बारकाजी रेवस्कर, दर्यापूरमध्ये दादाराव सीताराम भोंगळे, लता शिवचरण गणवीर, धामणगाव रेल्वे किशोर महादेव परतेकी, धारणीत ज्ञानेश्वर सुखदेव सिरसाट, स्मिता सुभाष क्षीरसागर, मोशीमधून लिलाधर अजाब मासोदकर, नांदगाव खंडेश्वर मधून इंदिरा नरेंद्र पोटेकर, पांडूरंग महादेव भगेवार, डॉ. अजय विनायक मुरादे, तिवसामधून गजानन काकडे, वरुड तालुक्यात केशव वामन डफरे, स्वाती अरविद वानखडे व प्रणाली रमेश काकडे यांचा समावेश आहे.

## प्राचार्यांचे निवृत्ती वय ६५ करण्यासाठी सकारात्मक –उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील

### नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करा




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती,**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०च्या प्रभावी अंमलबजावणीत प्राध्यापक आणि प्राचार्यांची भूमिका महत्त्वपूर्ण असून, देशाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी त्यांनी धोरणाचे सर्व पैलू समजून घ्यावेत. प्राचार्यांच्या मागणीनुसार, त्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६२ वरून ६५ वर्षे करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय लवकरच मंत्रिमंडळ बैठकीत घेतला जाईल, असे प्रतिपादन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी आज येथे केले.

श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजित अखिल महाराष्ट्र फेडरेशन ऑफ प्रिन्सिपल असोसिएशन ऑफ नॉन-गव्हर्नमेंट कॉलेजेसच्या ४० व्या वार्षिक राज्यस्तरीय अधिवेशनाचे उद्घाटन मंत्री पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी आमदार किरण सरनाईक, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषदेचे अध्यक्ष डॉ. अनिल सहस्त्रबुध्दे, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मिलिंद बारहाते, उच्च शिक्षण संचालनालयाचे संचालक शैलेंद्र देवळाणकर यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

मंत्री पाटील म्हणाले की, जगात सर्वात मोठा तरुणांचा देश म्हणून भारताची ओळख आहे. पारंपरिक शिक्षणाऐवजी व्यावसायिक आणि प्रात्यक्षिक-आधारित शिक्षणाची आज गरज आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण ही गरज पूर्ण करेल. विद्यार्थी हित जोपासून शिक्षण क्षेत्रात महाराष्ट्राला अग्रस्थान मिळवून देण्यासाठी नवीन शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना संशोधनाच्या संधी उपलब्ध करून देणे, कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून आधुनिक अभ्यासक्रम तयार करणे आणि मातृभाषेतून शिक्षण देणे आवश्यक आहे. अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना कारखान्यात प्रत्यक्षिक प्रशिक्षण आणि सायंकाळी सैद्धांतिक अभ्यास अशी शिक्षण पद्धती राबवली जावी. यामुळे रोजगारनिर्मिती आणि संशोधनाला चालना मिळेल, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी अधिवेशनानिमित्त तयार केलेल्या स्मरणिकेचे विमोचन आणि उद्योग विभागाशी संबंधित 'आय हेल्प'वेब पोर्टलचे उद्घाटन मंत्री पाटील यांच्या हस्ते झाले.या समारंभात लक्ष्मीनारायण इनोव्हेशन टेक्नॉलॉजी विद्यापीठ, नागपूरचे कुलगुरु डॉ. अतुल वैद्य, उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. केशव तुपे, एनसीएल सुकाणू समितीचे सदस्य सीए अनिल राव, अखिल महाराष्ट्र फेडरेशन ऑफ प्रिन्सिपल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. आबासाहेब देशमुख, उपाध्यक्ष प्राचार्य नंदकुमार निकम, सचिव डॉ. सुधाकर जाधवर, प्राचार्य स्मिता देशमुख आदी यावेळी उपस्थित होते.–

### मुलींच्या शिक्षणासाठी प्रोत्साहन

राज्य शासन मुलींना पहिली ते पदवीपर्यंत मोफत शिक्षण देत आहे. ८४२ अभ्यासक्रमांचे शुल्क माफ करण्यात आले आहे. यात ट्यूशन आणि परीक्षा शुल्काचा समावेश आहे. येत्या काळात इतर शुल्काची प्रतिपूर्ती करण्याचा निर्णय घेतला जाईल. यामुळे मागील वर्षी व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश घेणाऱ्या मुलींची संख्या ५३ हजारांनी वाढली आहे. विद्यार्थ्यांना सर्व क्षेत्रात करिअरच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी शासन सर्वतोपरी सहाय्य करेल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

### २०४७ पर्यंत सर्वांगीण विकासाचे उद्दिष्ट

मंत्री पाटील यांनी सांगितले की, २०४७ पर्यंत भारताला सर्व क्षेत्रात अग्रेसर करण्यासाठी युवा पिढीला संधी उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. नवीन शैक्षणिक धोरणामुळे हे उद्दिष्ट साध्य होईल. बेरोजगारी संपवून प्रत्येकाच्या हाताला काम देणे, यातूनच आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक प्रगती शक्य होईल, असे त्यांनी नमूद केले.

### प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची भरती

*विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी मुख्यमंत्री यांनी ५,५०० नवीन प्राध्यापक आणि २,९०० शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या भरतीला मान्यता दिली आहे. तसेच, १९९३ पासून प्रलंबित असलेला एम.फिल, नेट/सेट बंधनकारक प्रश्न निकाली काढण्यात आला असून, यासाठी सुमारे १ हजार कोटी रुपये वितरित केले जातील. असोसिएट प्रोफेसर ते प्रोफेसर पदोन्नतीचा प्रश्नही लवकरच सोडवला जाईल, असे पाटील यांनी सांगितले.

## अकरावीसाठी २ फेरीत केवळ १७,२८५ प्रवेश 33 हजार जागा रिक्त

### विज्ञान शाखेला पसंती



**विदर्भ प्रजासत्ताकदि.२६अमरावती**

इयत्ता अकरावी कला, वाणिज्य व विज्ञान शाखेच्या प्रवेशाची दुसरी फेरी २९ जुलै रोजी संपली आहे. ज्या विद्याथ्यांचे प्रवेश अद्यापपर्यंत व्हायचे आहेत त्यांच्यासाठी तिसऱ्या प्रवेश फेरीचे वेळापत्रक प्रसिद्ध केले आहे. ६ ते २८ जुलै रोजी गुणक्ता यादीनुसार प्रवेश निश्चित करायचे आहे. तत्पूर्वी दुसऱ्या प्रवेशफेरी अंती १७ हजार २८६ प्रवेश झाले आहेत. यामध्ये सर्वाधिक ८ हजार ६१९ प्रवेश हे विज्ञान शाखेत झाले असून, सर्वात कमी १ हजार ७४५ प्रवेश हे वाणिज्य शाखेत झाले आहेत. तसेच ६ हजार ९२२ विद्याथ्यर्थ्यांनी कला शाखेत प्रवेश घेतला आहे. जिल्ह्यात अजूनही ३३ हजारांवर जागारिक्त आहेत.

जिल्ह्यात यंदा अकरावीची प्रवेश प्रक्रिया केंद्रीय ऑनलाइन पद्धतीने राबवण्यात येत आहे. या अंतर्गत जिल्ह्यातील ३१० कनिष्ठ महाविद्यालयांमधील ४२ हजार १८० जागांसाठी आतापर्यंत ३० हजारांवर विद्याथ्यांनी नोंदणी केली आहे. यावर्षी तांत्रिक अडचणीमुळे अकरावी प्रवेशाला उशीर झाला. पहिल्या फेरीअंती जिल्ह्यात कला शाखेच्या १,७४८, वाणिज्य शाखेच्या ६१८ आणि विज्ञान शाखेच्या ३,१५४ अशा ५,५२० जागांवर हे प्रवेश घेण्यात आले. त्यानंतर रिक्त जागांसाठी १८ ते २१ जुलै दरम्यान दुसरी फेरी राबवली. या तीन दिवसांत विद्यार्थ्यांना संबंधित विद्यालयांमध्ये प्रवेश निश्चित केले. यात आतापर्यंत १७ हजार २८६ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले आहेत. आता रिक्त राहिलेल्या जागांसाठी तिसरी फेरी २६ जुलैपासून राबवण्यात येणार असल्याचे समितीच्या वतीने सांगण्यात आले.

## राज्य निवडणूक आयुक्तांनी केली जिल्हाधिकारी कार्यालयाची पाहणी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अकोला,–** राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे यांनी आज अकोला येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नूतन इमारतीची पाहणी केली. जिल्हाधिकारी अजित कुंभार यावेळी उपस्थित होते. आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर पूर्वतयारीचा आढावा श्री. वाघमारे यांनी अमरावती येथे विभागीय कार्यालयात आयोजित बैठकीत गुरूवारी घेतला. त्यानंतर आयोगाच्या सुनावणी कामकाजासाठी त्यांचे आज अकोला जिल्हाधिकारी कार्यालय येथे आगमन झाले. सुनावणी कामकाजानंतर त्यांनी नूतन इमारतीची पाहणी केली इमारतीतील आनंदी कक्ष, आवश्यक दस्तऐवज तत्काळ मिळण्यासाठी किऑस्क सुविधा, हिरकणी कक्ष, सूचनाफलक आदी विविध सुविधांची पाहणी श्री. वाघमारे यांनी केली. जिल्हाधिकारी श्री. कुंभार यांच्यासह निवासी उपजिल्हाधिकारी विजय पाटील, जिल्हा माहितीविज्ञान अधिकारी अनिल चिंचोले आदी उपस्थित होते.

# ऑर्थोपेडिक डॉक्टरवर महिलेसोबत गैरवर्तनाचा आरोप

## परतवाडा पोलिस ठाण्यात अदखलपात्र गुन्ह्याची नोंद, कारवाई न झाल्यास आमरण उपोषण पतीचा इशारा, डॉक्टरांनी आरोप फेटाळले

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अचलपूर :–** रुग्णा सोबत डॉक्टरने कसे बोलावे याचे काही अलिखित नियम आहेत डॉक्टरांच्या बोलण्याने रुग्णाचा अर्धा हजार बरा होतो असे म्हटले जात असले तरी एका डॉक्टरने रुग्ण महिलेसोबत अरेरावीची भाषा करत तिला रुग्णालयातून हाकलून लावल्याची घटना परतवाडा येथे येथील एका दवाखान्यात घडल्याचे समोर आले आहे परंतु डॉक्टरांनी आपल्यावरील आरोप फेटाळले आहेत परतवाडा रोडवरील नवले ऑर्थोपेडिक हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी गेलेल्या महिलेवर आणि तिच्या आईवर डॉक्टरने गैरवर्तन केल्याचा आरोप करण्यात आला आहे. यासंदर्भात रुग्ण महिलेने परतवाडा पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली असून, भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३५२ अंतर्गत पोलिसांनी एनसी (गैरदंडनीय) स्वरूपात गुन्हा नोंदवला आहे. दरम्यान, पीडित महिलेच्या पतीने देखील या प्रकरणाची गंभीर दखल घेतली असून, उपविभागीय अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षक अमरावती यांच्याकडे निवेदन देऊन संबंधित डॉक्टरवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. कारवाई न झाल्यास आठ दिवसांनंतर तहसील कार्यालया समोर आमरण उपोषण करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

**काय आहे प्रकरण?**

धोतरखेड़ा येथील एक महिला दि २१/ ७ / २०२५ रोजी आपल्या आजारपणावर उपचार घेण्यासाठी डॉक्टर शशिकांत नवले यांच्या रुग्णालयात गेली होती. त्याच दरम्यान तिच्या मुलीच्या हातावर ऑपरेशन एका दुसर्या रुग्णालयात करण्यात आले होते. याच गोष्टीवरून डॉक्टर नवले नाराज झाले आणि रुग्ण महिलेला व तिच्या आईवर जोरात खवळून दवाखान्यातून हाकलून लावले असा आरोप दिलेल्या लेखी निवेदनातून करण्यात आला आहे.महिलेच्या तक्रारीत डॉक्टर नवले यांनी अशोभनीय भाषा वापरून मानसिक त्रास दिला, असा स्पष्ट उल्लेख करण्यात आला आहे. या तक्रारीची पोलिसांनी दखल घेतली असून प्राथमिक स्वरूपात अदखलपात्र गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. या घटनेमुळे परतवाडा परिसरात डॉक्टर नवले यांच्या वर्तनावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, स्थानिकांमध्येही या घटनेची चर्चा आहे. डॉक्टरांनी रुग्णांशी अशा प्रकारचे वर्तन करणे ही वैद्यकीय व्यवसायाची बदनामी असल्याचे मत अनेकांनी व्यक्त केले आहे.आमरण उपोषणाचा ईशारा पीडित महिलेचे पती शेख नईम शेख रहीम यांनी वरिष्ठ प्रशासनाला साकडे घालत डॉक्टर नवले यांच्यावर आठ दिवसांत कठोर कारवाई न झाल्यास तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा उपविभागीय अधिकार्यांना लेखी निवेदनाद्वारे दिला आहे.




सदर महिला सांगते आहे तसा कुठलाही प्रकार घडला नाही ती महिला रुग्ण दवाखान्यात आली तेव्हा मी टेन्शनमध्ये होतो मी त्या महिलेला दवाखान्यातून हाकलले नाही परंतु मोठ्याने बोललो. अशी माहिती डॉ शशिकांत नवले (अस्थिरोग तज्ञ) परतवाडा यांनी दिली.

# जबाबदारी निश्चित : प्रशासकासह ७ कर्मचार्यांच्या नावे रकमा

## अचलपुर बाजार समितीमधील घोटाळा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अचलपूर**

अचलपूर बाजार समितीमध्ये एक वर्षात कोटींच्यावर घोटाळा झाल्याचे ऑडिट आहवालात स्पष्ट झाले आहे. त्यापैकी ९२ लाख ४० हजार १५२ रुपयांची प्रशासकासह कर्मचार्यांवर जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे.

त्यामध्ये प्रशासक एस. टी. केदार, प्रभारी सचिव अमर वानखडे, तत्कालीन लेखापाल जनार्दन गुळपे, संगणक लिपीक योगेश चव्हाण, मनोज ठाकरे व एक अन्य एक कर्मचारी यांचा समावेश आहे. यामध्ये ७ पैकी तिघांवर सर्वाधिक ८७ लाख ९ हजार ४०० रुपयाची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. त्यामध्ये एस. टी. केदार, अमर वानखडे व जगन्नाथ गुडदे यांचा समावेश आहे.याव्यतिरिक्त वानखडे यांचेवर १० लाख ४ हजार १८४, जनार्दन गुडदे यांचेवर २ लाख १२ हजार १०३, योगेश चव्हाण यांच्यावर ३७हजार ८१५ तर मनोज ठाकरे व गुळवे यांच्यावर २० हजार १७५ रु व अन्य एका कर्मचार्यावर १२ हजार ९४८ रुपयांची जबाबदारी अंकेक्षण अहवालामध्ये निश्चित करण्यात आली आहे. शासकीय




ऑडिटर गवळे यांनी वसूल पात्र रकमेचा गोषवारा या मथळ्याखाली सदर रकमांचा उल्लेख केला आहे. २०२२-२३ आणि २३- २४ या आर्थिक वर्षाचे अंकेक्षण नुकतेच पूर्णत्वास असून २०२२-२३ या कार्यकाळात प्रशासक यांच्याकडे बाजार समितीच्या प्रशासनाची जबाबदारी सोपविण्यात आली होती. दरम्यानच्या काळामध्ये झालेल्या आर्थिक बाबोंचे ऑडिट नुकतेच करण्यात आले. त्यामध्ये घोटाळा झाल्याचा गौप्यस्फोट ऑडिट अहवालामध्ये करण्यात आला होता. नुकत्याच पार पडलेल्या बाजार समितीच्या जनरल सभेमध्ये हा महाघोटाळा ठेवण्यात आला. त्यावर उपस्थित सभापती, उपसभापती आणि संचालकांनी सविस्तर विषय जाणून घेतला, तसेच या वसूलपात्र रकमेची निश्चित करण्यात आलेली जबाबदारी वसूल करण्याच्या उद्देशाने व कायदेशीर प्रक्रिया करण्याच्या हेतूने निर्णय घेण्यात आला आहे.

# मोबाइल नंबर अपडेट करा, वीज सेवेचे ‘एसएमएस’ मिळवा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अमरावती–** वीज बिलाचा तपशील तसेच वीजपुरवठा बंद असण्याचा कालावधी व इतर माहिती एसएमएसद्वारे मिळवण्यासाठी अमरावती परिमंडळातील साडेतेरा लाख ग्राहकांनी महावितरणकडे मोबाइल क्रमांक नोंदवला आहे. हे एसएमएस मराठी किंवा इंग्रजीत दिले जात असून, भाषा निवडीचे अधिकार ग्राहकांना आहेत.अमरावती जिल्ह्यातील ८ लाख ४२ हजार ४९४ ग्राहकापैकी ७ लाख ग्राहकांनी – ४५ हजार १४ – महावितरणकडे मोबाइल क्रमांकाची – नोंद केलेली आहे. नोंदणीकृत – ग्राहकांना वीज बिलाची माहिती, – तांत्रिक बिघाड किंवा नियोजित देखभाल व दुरुस्तीमुळे वाहिनीवरील वीजपुरवठाबंद असलेला होण्याचा कालावधी, मीटर रीडिंग, बिल भरण्याची अंतिम तारीख ही माहिती त्यांच्या मोबाइल क्रमांकावर ’एसएमएस’द्वारे पाठवण्यात येत आहे. महावितरणकडून ग्राहकांना मोबाइलवर पाठवले जाणारे संदेश मराठी किंवा इंग्रजी या भाषेत दिले जातात. त्यासाठी भाषा निवडीचे अधिकार ग्राहकांना आहेत. या सेवेसाठी अर्ज करताना जी भाषा ग्राहकाने निवडली आहे, त्या भाषेत त्यांना संदेश जात असल्याचे महावितरणने कळवले आहे.ग्राहकाने ग्राहक लिंकवर जाऊन भाषेचा पर्याय निवडू शकतात किंवा भाषा निवडीसाठी चङ–छ्रऋ १२ अंकी ग्राहक क्रमांक हा एसएमएस ९९३०३९९३०३ क्रमांकावर पाठवू शकतात.–

# जिल्ह्यात २८५ गते स्मशान भूमीविनाच

## ७०० गावांमध्ये स्मशानभूमीकरिता जागा आहे, परंतु सुविधा नाही

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अमरावती :**

निधनानंतर मानवी शरीर जेथे अनंतात विलिन होते, ती जागाच मुव्वत गावात नसणे, म्हणजे मोठी शोकांतिका म्हणावी लागेल. जिल्ह्यात अशा २८५ गावांमध्ये मोक्षप्राप्तीकरिता जागाच नाही. त्यामुळे अंत्यविधी कुठे करावा, असा प्रश्न गावकर्यांना पडतो. परिणामतः नागरिकांमध्ये रोष वाढत आहे. या गावांमध्ये स्मशानभूमीकरिता जागा देण्याची मागणी जोर धरत आहे. याशिवाय सातशे गावांमध्ये जागा आहे. परंतु शेडच नाही. त्यामुळे स्मशानभूमीकरिता जागा आणि सुविधा देण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.गाव तिथे स्मशानभूमी असे शासनाचेच धोरण आहे. निधानानंतर त्या मानवी शरीरावर अंत्यविधीचे सोपस्कार व्यवस्थित करता यावे याकरिता बहुतांश गावांमध्ये स्मशानभूमीकरिता लाखो रुपये मंजुर करुन सुसज्ज स्मशानभूमी निर्माण करण्यात आल्या आहेत येथे शेडसह पाणी व रस्त्यांचे काँक्रीटीकरण देखील करण्यात आले आहे.परंतु जिल्ह्यात आजही असे गावे आहेत तेथे स्मशानभूमीच नाही. त्यामुळे त्यांना नजिकच्या गावांमध्ये जाऊन अंत्यविधी करावा लागतो. काही गावांमध्ये जागा परंतु सुविधा नाही, तेथे शेड देखील नाही. जिल्ह्यात ८४१ ग्रामपंचायती अंतर्गत १६१८ गावे आहेत. यामध्ये ९१८ गावांमध्ये सुविधांसह स्मशानभूमी आहे. परंतु ७०० गावांमध्ये जागा असून शेड नाही. तर २८५ गावांमध्ये स्मशानभूमीकरिता जागाच उपलब्ध नाही. त्यामुळे अंत्यसंस्कार कुठे करावा, असा प्रश्न त्यांना पडतो. यातील कित्येक गावांमध्ये जागांकरिता महसूल विभागांकडे प्रस्ताव गेले आहे. परंतु यावर अद्याप कारवाई झाली नाही. त्यामुळे स्मशानभूमीकरिता जागा आणि तेथे सुविधा देण्यात याव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.



# प्रो. राम मेघे कॉलेजमध्ये एमबीए अभ्यासक्रमाला शासन मान्यता




**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अमरावती**

विदर्भ युथ वेलफेअर ॲण्ड एज्युकेशन सोसायटीद्वारा संचालित प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड मॅनेजमेंट, अमरावती या नामांकित महाविद्यालयास अखेर एम.बी.ए. (मास्टर ऑफ बिझनेस अॅडमिनिस्ट्रेशन) अभ्यासक्रमासाठी महाराष्ट्र शासन व ऑल इंडिया कौन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेशन (एआयसीटीई) यांच्याकडून अधिकृत मान्यता प्राप्त झाली आहे.

> एम. जाया हीस्पर्धात्मक अत्यावश्यक शैक्षणिक पायरी ठरत असून विद्यार्थ्यांसाठी ती संधी उपलब्ध होणार आहे. ’रोजगार संधीविषयक मार्गदर्शन व प्रयन्त महाविद्यालयातर्फे करण्यात येणार आहे.
>
> **– डॉ. नितीन धांडे** अध्यक्ष, विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी, अमरावती.



२०२५-२६ या शैक्षणिक सत्रापासूनविद्यार्थ्यांना या नव्याने सुरु होणाऱ्या दोन वर्षीय एम.बी.ए. अभ्यासक्रमात प्रवेशाची संधी उपलब्ध होणार आहे. हा अभ्यासक्रम व्यवस्थापन कौशल्यांचा विकास उद्योगजगतात करिअर घडविण्यासाठी उत्तम आधार ठरणार आहे. या मान्यतेसाठी संस्थेच्या नेतृत्वाने सातत्याने प्रयत्न केले. या यशामागे संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडेयांचे दूरदर्शी नेतृत्व, उपाध्यक्ष ॲड. उदय देशमुख, कोषाध्यक्ष प्रा. डॉ. हेमंत देशमुख, सचिव युवराजसिंह चौधरी, तसेच कार्यकारिणीतील कार्यकारी सदस्य नितीनहिवसे, प्रा. डॉ. पूनम चौधरी, पंकज देशमुख, प्रा. विनय गोहाड प्रा. गजानन काळे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय ठाकरे यांचे योगदान आहे.हा अभ्यासक्रम प्रकल्पाधारित शिक्षण, इंडस्ट्री इंटरॅक्शन, लाईव्ह केस स्टडीज, मार्केट रिसर्च, आणि प्लेसमेंट सेल मार्फत उद्योगांशी थेट जोडणारा असेल. विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक नव्हे तर जॉब रेडी स्किल्स मिळणार आहेत. आजच्या स्पर्धात्मक युगात एम.बी.ए. ही एक अत्यावश्यक शैक्षणिक पायरी ठरत असून विदर्भातील विद्यार्थ्यांसाठी आता अमरावतीतच ती संधी उपलब्ध होणार आहे. या अभ्यासक्रमास उच्चशिक्षित प्राध्यापक राहणार आहे.

# येत्या २४ तासात २०४ मिमीपेक्षा अधिक पावसाची शक्यता, ताशी ४० ते ५० किमी वेगाने वारे

**विदर्भ प्राजासत्ताक दि.२६अमरावती–** राजधानी मुंबईसह चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा येथे पावसाचा जोर कायम असून भारतीय हवामान खात्याने सतर्कतेचा इशारा दिला आहे. राज्यात येत्या २४ तासात २०४ मिलिमीटर पेक्षा अधिक पावसाची शक्यता वर्तविण्यात आली असून आज पालघर, पुणे घाट परिसर तसे ह विदर्भातील चंद्रपूर आणि गोंदिया जिल्ह्याला रेड अलर्ट देण्यात आला आहे. भारतीय हवामान खाते व आपत्ती व्यवस्थापन विभागाने पूर, भूस्खलन आणि पाणी साचण्याचा धोका लक्षात घेता नागरिकांना सतर्क राहण्याचा आणि प्रशासनाच्या सूचनांचे पालन करण्याचा सूचना दिल्या आहेत.

**या जिल्ह्यांना अलर्ट**

ठाणे, मुंबई आणि संपूर्ण कोकण विभाग, जळगाव, नाशिक घाट, सातारा घाट, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, अमरावती, भंडारा, गडचिरोली, नागपूर आणि वर्धा या जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. या भागांमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. येत्या २४ तासांत ११५ ते २०४ मिलिमीटर पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. तर याच कालावधीत वादळी वारे ४० ते ५० किलोमीटर प्रतितास वेगाने वाहण्याची शक्यता आहे. तसेच विजांचा कडकडाट येण्याचीही शक्यता आहे.



**विदर्भात पावसाची स्थिती**

पूर्व विदर्भातील सहाही जिल्ह्यांना मुसळधार पावसाचा अलर्ट जारी करण्यात आला आहे. संपूर्ण विदर्भात आज शनिवार, २६ जुलैला ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने सोसाट्याचे वारे वाहण्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. गोंदिया आणि चंद्रपूर या दोन जिल्ह्यांना विजेच्या कडकडाटासह अत्यंत मुसळधार पाऊस आणि अतिवृष्टीचा रेड अलर्ट देण्यात आलाय. तर नागपूर, वर्धा, भंडारा, गडचिरोली, अमरावती जिल्ह्यांना मुसळधार ते खूप मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट घोषित करण्यात आला आहे. उर्वरित संपूर्ण पश्चिम विदर्भात येलो अलर्ट जाहीर करण्यात आला असून कित्येक ठिकाणी हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता हवामान खात्याने व्यक्त केलीय.–

# किशोर कुमार यांच्या ९६ व्या जयंतीनिमित्त अमरावती त होणार ९६ तासाचा वर्ल्ड रेकॉर्ड

## चार ऑगस्ट ते ८ ऑगस्ट रंगोली लॉन येथे होणार आयोजन



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६ अमरावती** अमरावती येथील सूर संगीत कराओके क्लबचे संचालक प्रभूदास फंदे, व पवन फंदे तसेच नागपूर येथील मनीष पाटील फाउंडेशन द्वारा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे . सलग ४ ऑगस्ट ते ८ ऑगस्ट दिवस रात्र चालणाऱ्या या वर्ल्ड रेकॉर्ड करिता आतापर्यंत १५० कलाकारांनी आपला प्रवेश निश्चित केला आहे. दिवस रात्र चालणाऱ्या या वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये एकूण २५० कलाकारांचे गाणे सादर केले जातील त्यापेक्षा जास्त कलाकारांना यामध्ये सहभाग घेता येणार नाही. यामध्ये फक्त किशोर कुमार यांच्या आवाजातील गाणे कलाकार गाणार आहेत. यामध्ये सहभागी झालेल्या सर्व कलावंतांना वर्ल्ड रेकॉर्डचे प्रमाणपत्र व मेडल देऊन त्यांचा गौरव करण्यात येईल या कार्यक्रमाकरिता शहरातूनच नव्हे तर बाहेर जिल्ह्यातील सुद्धा कलाकारांची उपस्थिती राहील.तरी आपण जास्तीत जास्त कलाकारांनी या कार्यक्रमांमध्ये भाग घेऊन किशोर दादा यांच्या ९६ वर्ल्ड रेकॉर्डचे भागीदार व्हा तसेच कार्यक्रम पाहण्याकरता जास्तीत जास्त श्रोत्यांनी उपस्थित राहण्याचे आव्हान आयोजकाकडून करण्यात आले आहे.पत्रकार परिषदेला उपस्थित मनीष पाटील फाउंडेशन नागपूर, प्रभूदासजी फंदे , शैलेश शिरभाते, राजेश वाडेकर ,जोसना शेटे ,बबलू ठाकूर ,गौरी सतके, कल्पना नाईक उपस्थित होत्या

# दुय्यम निबंधकांनी नोंदविली बेकायदेशीर खरेदी !

## भातकुलीतील शेतकऱ्याची जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६भातकुली** भातकुलीस्थित दुय्यम निबंधक कार्यालयातील नोंदणी अधिकारी एस. पी. मालोकार यांनी गणोजा शिवारातील सामाईक शेतीचा खरेदी दस्त बेकायदेशीर नोंदविल्याची तक्रार गणोजा येथील शेतकरी दीपक गावनेर यांनी जिल्हाधिकारी तसेच पोलीस आयुक्तांकडे केली. त्यावरून पोलीसांकडून चौकशी निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर यांनी मुद्रांक जिल्हाधिकाऱ्यांना पत्र देऊन उचित कार्यवाही करण्याचे म्हटले आहे. सुरू असूनतक्रारीनुसार, दीपक गावनेर हे मौजा गणोजादेवी येथील मूळ रहिवासी असून स्थानिक लक्ष्मीनगर येथे हल्ली मुक्कामी राहतात. त्यांनी बहिण उषा माणिकराव पावडे (रा.महादेवखोरी, अमरावती), आशा प्रभाकर जोगी (रा. लाखपुरी), आई कमल गणेशराव गावनेर, खरेदीदार संदीप देवनाथ शिंदे (रा. वाशिंबा, जि. अकोला), चंदू बळीराम खोब्रागडे (रा. गणोजादेवी), पद्माकर पांडुरंगसा गुल्हाने (रा. गणोजादेवी), उत्तम तुकाराम डाखोडे (रा. आशियाड कॉलनी, अमरावती), अनिल प्रकाश जोगी (रा. लाखपुरी) या आठ जणांविरुद्ध संबंधित तक्रार केलेली आहे.

तक्रारदार दीपक गावनेर हे वडिलोपार्जित १ हेक्टर ४१ आर शेतजमिनीचे सहमालक आहेत. त्या शेताच्या सातबाऱ्यावर त्यांच्यासह त्यांच्या दोन बहिणी व वृद्ध आईचे नाव आहे. चारही जण त्या शेतीचे संयुक्त मालक असताना आईचा वृद्धत्वांचा गैरफायदा घेत दोन बहिणींनी अन्य गैरअर्जदारांच्या मदतीने त्या वडिलोपार्जित शेतातील २५ टक्के शेताची अल्प किमतीत विक्री केल्याचे दीपक गावनेर यांचे म्हणणे आहे. आपण त्या शेतीचे सहमालक असताना आपली सहमती वा स्वाक्षरी न घेता ती खरेदी करून देण्यात आली, असा आरोप गावनेर यांनी केला आहे. वडिलांच्या मृत्यूनंतर आपल्या आईसह आपले व दोन बहिणींची नावे ७/१२ वर चढली. मात्र, दुय्यम उपनिबंधकांनी चतुःसीमा नमूद नसलेल्या व आपल्या वाहितीत असलेल्या शेतीचें खरेदीखत कसे नोंदवून घेतले, ताबा कसा दिला, असा प्रश्न गावनेर यांनी उपस्थित केला आहे.

# सायबर सेल टीम पोलिसांचा वाहन अपघात संशयास्पद

## बासलापूर- चिरोडी दरम्यान घडला होता अपघात



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६चांदूर रेल्वे**

सायबर सेल टीम पोलिसांच्या वाहनाचा अपघात चांदूर रेल्वे ते अमरावती रस्त्यावर बासलापूर - चिरोडीदरम्यान रविवारी (ता. २०) रात्री ११ वाजता दरम्यान घडला. या अपघातात एका पोलिसाचा उपचारादरम्यान २१ जुलै रोजी रात्री ८ वाजताच्या दरम्यान मृत्यू झाला असून अन्य ३ जखमीवर उपचार सुरू आहे. या अपघाताची हळहळ व्यक्त होत असतानाच या अपघातामध्ये संशय व्यक्त केल्या जात आहे. टीम खरंच तपासासाठी आली होती की दुसऱ्याच कामासाठी आली होती, असे एक ना अनेक प्रश्न निर्माण होत असतानाच पोलिसांकडून या प्रकरणात कमालीची गुप्तता पाळल्या जात असल्याने हे प्रकरण वेगळेच असल्याची चर्चा सुरू आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, सायबर सेलची टीम ही चादूररेल्वे पोलिसस्टेशन हद्दीतील चोरीसंदर्भातील गुन्ह्याचा मोबाईल डमडाटा काढण्याकरिता सरकारी वाहनक्र, एमारच २७ एए०६३८ या वाहनाने आलेहोते, मग परत जात असतांना हे वाहन एका ठिकाणी जाऊन काही वेळाने परत आल्यामुळे या प्रकरणात अनेक संशयास्पद बाबी पुढे येत आहे. वाहनाचा जीपीएस डेटा, वाहनाचा वेग आणि अपघात लपविण्याचा विषय चर्चेला येत आहे. सूत्रांव्दारे मिळालेल्या माहितीनुसार, या शासकीय वाहनात जीपीएस प्रणाली होती. त्यामुळे अपघातापूर्वीचा वाहनाचा मार्ग, थांबे, वेग आणि वेळेचा तपशील नोंदवलेला आहे; परंतु हा डेटा उघड केला जाईल की दडपला जाईल, याबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत आहे. विशेष म्हणजे, अपघाताची माहिती एका नागरिकाने पोलिसांना थेट डायल ११२ वर दिली. त्यामुळे अपघाताचे बिंग फुटल्याचे सूत्रांकडून सांगितले जात आहे. पोलिस अधीक्षक यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी सुरू केल्याचे समजते. त्यामुळे सदर प्रकरणाचा सखोल तपास होऊन सत्यता उघड होणे महत्त्वाचे झाले आहे. जात आहे.

**अपघातग्रस्त वाहन दुसऱ्या दिवशी आणले चांदूर पो.स्टे. ला**

सदर अपघात झाल्यानंतर या अपघातग्रस्त वाहनाला प्रथम अमरावती नेल्याची माहिती सूत्रांद्वारे मिळाली आहे. अपघात चांदूर रेल्वे पोलिसस्टेशन हद्दीत असताना वाहन अमरावतीला का नेले? यावरसुद्धा आता प्रश्न उपस्थित होत आहेः मात्र दुसऱ्या दिवशी दुपारी सदर अपघातग्रस्त वाहन हे अमरावतीवरून चांदूर रेल्वे पोलिसस्टेशनमध्ये जमा करण्यात आले. यावरूनसुद्धा अपघाताविषयी संशय निर्माण होत आहे.

# शेतकऱ्यांचे पावसाळ्यातही रात्रीला मुक्काम शेतातच

## जंगली जनावरांमुळे पिकांचे मोठ्याप्रमाणात नुकसान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६नांदगाव खंडेश्वरः**

तालुक्यात रोही रानडुकर हरीण इत्यादी जंगली जनावराचा हैदोस वाढला असल्यामुळे शेतातील पीक फस्त करीत आहे. अनेक उपाययोजना करून शेतकरी हतबल असून अखेर जंगली जनावरांपासून पिकाचे संरक्षण व्हावे, याकरिता शेतकरी पावसाळ्यातसुद्धा रात्रीचे मुक्काम शेतामध्येच करून रात्र काढती.

अशावेळी विषारी सरपटणारे प्राणी, रानडुकरासारखे अन्यप्राणी यांडापासून रात्रीच्या वेळी जिवाला धोका असूनही जिवावी पर्वा न करता कुटुंबाकरिता शेतकरी हा धोका पत्करत आहे. हल्ली शेतामध्ये रात्रीला रोही,रानडुक्कर, हरीण इत्यादी वन्य जनावरांचा कळप रात्रीला शेतामध्ये येऊन सोयाबीन, तूर, कपाशी यासह इतर पिकांचे नुकसान करत आहे. हा प्रकार अनेक वर्षापासून सुरु असून शेतकऱ्यांच्या या समस्याची वनविभाग व शासनाने दखल घेण्यात आली नसून वन्यप्राण्याला शेतशिवारपासून दूर ठेवण्यासाठी वनविभागाकडून कोणतीच ठोस ज्यायोजना नाही. शेतकऱ्यांनी हजारो रुपये उसनवारी किवा कर्ज काढून शेतीवर पेरणीच्या माध्यमातून खर्च केला मोल्या प्रमाणात नुकसान होत वन्याण्याच्या हैदोसामुळे पिकाचे असून शेतकरी वैतागला. अखेर जिवाची पर्वा न करता पिकाव्या संरक्षणाकरिता रात्रीसुद्धा शेतावर पावसाळ्यातही जागरण करून रात्र काढतो, हे विदारक सत्य असूनही वनविभाग व शासन शेतकऱ्यांप्रती उदासीन असून वन्यप्राण्यांचा बंदोबस्ताकरिता उपाययोजना कायम झालेल्या वन्यप्राण्यांमुळे नुकसानीनंतर वनविभागाकडून शेतक-याला नुकसान भरपाई फारच अत्यल्प प्रमाणात नावापुरतीच दिल्या जाते. हल्ली दमदार पावसाचा आभाव त्यातच निसर्गाची अवकृपा असल्याने बुरशीजन्य हुमणी अळीचा प्रादुर्भाव वाढला असून वन्य प्राण्यांच्या हैदोसामुळे पिकांचे होत असलेल्या नुकसानाने शेतकरी वैतागला असून अखेर जिवावी पर्वा न करता रात्रीसुद्धा शेतामध्येच जागरण करीत आहे.

# नांदगाव पेठ टोलनाक्याजळ रास्ता रोको आंदोलन

## बच्चु कडूंसह १५०-२०० कार्यकर्त्यांविरुध्द गुन्हेनांदगाव पेठ ,बडनेरा पोलिसांची कारवाई



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

नांदगाव पेठ टोलनाक्याजळ रास्ता रोको आंदोलन केल्याप्रकरणी माजी मंत्री बच्चु कडू यांच्यासह सुमारे १५०-२०० कार्यकर्त्यांविरुध्द दाखल केले आहेत. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसह अन्य नांदगावपेठ पोलिसांनी गुन्हे मागण्यांसाठी प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने गुरुवारी राज्यव्यापी आंदोलन करण्यात आले होते.

नांदगाव पेठच्या टोलनाक्या जवळही मोठ्या प्रमाणात रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनामुळे पोलिस आयुक्तांच्या आदेशाचे उल्लघंन करण्यात आले असून, यामुळे माजी मंत्री बच्चु कड यांच्यासह अन्य कार्यकर्त्यांविरुध्द नांदगाव पेठ पोलिसांनी कलम १२६-२/१८९-२ बिएनएस सहकलम १३५ नुसार गुन्हे दाखल केले आहेत.सरकारतर्फे गजानन कवडे यांच्यातर्फे दाखल केलेल्या फिर्यादीनुसार ही कारवाई करण्यात आली आहे. गुन्हे दाखल केलेल्या नेत्यांमध्ये माजी मंत्री बच्चु कडू यांच्यासह बंटी रामटेके, मंगेश देशमुख, प्रदीप बंड, प्रशांत शिरभाते, गोलू उर्फ राहुल पाटीलसह१५० ते २०० कार्यकर्त्यांचा समावेश आहे.तर बडनेरा पोलीस ठाण्याअंतर्गत ९ कार्यकर्त्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# यशोदा नगर चौकात २५ लक्ष रुपये खर्चाच्या लॅम्प-घड्याळ स्तंभाचे आ . रवी राणा व आयुक्त सौम्या शर्मा यांचे शुभ हस्ते लोकार्पण

## माझे मतदार संघात भीम टेकडी आहे हे माझे भाग्य समजतो-आ. रवी राणा





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

आमदार रवी राणा व मनपा आयुक्त प्रशासक सौम्या शर्मा यांच्या शुभहस्ते यशोदा नगर चौकातील २५ लक्ष रुपये खर्चाच्या आकर्षक लॅम्प-घड्याळ स्तंभाचे लोकार्पण करण्यात आले. यानंतर दोघांनी परिसरात पायदळ फिरून यशोदा नगर, उत्तम नगर, भीमटेकडी, संजय गांधी नगर, शिक्षक कॉलनी, बेनोडा, शांती निकेतन, या परिसराची पाहणी केली आणि परिसरात साफसफाई व स्वच्छतेसाठी तातडीने उपाययोजना करण्याचे स्पष्ट निर्देश दौऱ्यात सोबत असलेल्या संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

या निमित्ताने पुढे पायदळ चालत आमदार राणा यांनी भिम टेकडी येथे जाऊन सर्व प्रथम शांती दूत गौतमबुद्ध बुद्ध पूजा केली व विश्व रत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला हार अर्पण करून पूजन केले आ.रवी राणा यांनी शांती दूत गौतमबुद्ध व विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा जय घोष केला. उपस्थित उपासक उपासिकांनीही जय घोष केला.आपल्या मनोगतात आमदार रवी राणा यांनी परिसरातील विकास योजनांनाही गती देण्यात येईल आहे. या ठिकाणी मंजूर निधीतून सर्व विकास कामे सुरू करून वेळेत पूर्ण करण्यासाठी अधिकाऱ्यांना निर्देश दिले.भिम टेकडी परिसरात अशोक स्तंभ, सभागृह,पिण्याच्या पाण्याची सोय, सोबत च सुलभ शौचालय, इत्यादी कामे करण्यात येईल.ओपन थिएटर व फाउंटन लाईट हे कामे पूर्ण करावी असे निर्देश राणा यांनी दिले.हि भीमटेकडी माझे मतदार संघात आहे हे माझे भाग्य आहे असे राणा यांनी म्हटले. येथील सर्वांगीण विकास करण्यात येणार असल्याचे आश्वासन आमदार राणा यांनी दिले.वर्ष १९६६ मध्ये स्थापन झालेल्या या भीम टेकडी या स्थळाचा इतिहास लक्षात घेता येथील सौंदर्यकरण व मूलभूत सुविधा जलद गतीने पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी या वेळी दिले.शांतिदूत भीम टेकडी येथील विकास करण्यासाठी नेहमीच तयार असतो, असे ठाम प्रतिपादन आमदार रवी राणा यांनी यावेळी केले. सोबतच आयुक्त सौम्या शर्मा यांनी ही मनपा चे निधीतून येथे विकास कामे करावी असे आवाहन आमदार राणा यांनी केले. आयुक्त मॅडम यांचे काम खूप चांगले आहे त्यांचे मनोगत व्यक्त करताना आ रवी राणा अभिनंदन केले. यावेळी भीम टेकडी समिती चे ट्रस्ट चे अध्यक्ष व पदाधिकारी व भाजपा पक्षाचे पदाधिकारी व युवा स्वाभिमान पक्षाचे खालील पदाधिकारी उपस्थित होते त्या मध्ये भारत मनपाचे अधिकारी शहर अभियांत पवार, बोबडे, चव्हाण, मेडिकल ऑफिसर डॉ जाधव व इतर अधिकारी उपस्थित होते तर पदाधिकाऱ्यांना मध्ये भारत शहारे, किशोर तायडे, गोपाल इंगळे, रमेशचंद्र रंगारी, घनशाम आकोडे, आनंद तायडे, उत्तमराव शिंगणापुरे, पी.टी.खडसे, तिडके, कुसुम वानखडे यासोबतच सुनिल राणा, माजी नगरसेविका संध्या टिकले, शैलेंद्र कस्तुरे, सोनाली नवले, नितीन बोरेकर, उमेश ढोणे, सचिन भेंडे, दिनेश सेठिया, प्रा.संतोष बनसोड, हर्षल रेवणे, आशिष गावंडे, अर्चना तालन, लक्ष्मणराव लाठेकर, मिलींद कहाळे, महेश मुलचंदानी, प्रकाश कठाने, विनोद मुधोळकर, उद्धव कराळे, स्वानंद पहुलकर, अनुप अग्रवाल, तुषार दुधे, भुषण पाटणे, निलेश भेंडे, विलास मालवीय, अमोल पवार, पंकज सुरळकर, मकसुद भाई, धनंजय लोणारे, नितीन तायडे, धिरज मोरे, अभिषेक कोरे, उमेश वानखडे, संजय गायकवाड, गौतम हिरे, सद्दाम हुसेन, हरिभाऊ नाडे, छोटु आकोटकर, नितीन कळंबे, प्रविण आकोडे, वंदना जामनेकर, नंदा सावदे, भरत सहारे, गोपाल इंगळे, लता अंबुलकर, सविता नेवारे, शोभा किटके, निता खडसे, नंदा पाचडे, किर्ती लोहरे, सुनिता राऊत, दिपा धाकडे, कोकिळा इंगळे, किर्ती लोरे, सुनिता उके, राजेश तरडेजा, शिल्पा साखरकर, शितल पवार, मंदा राऊत, उषा गावंडे, शितल भोंबे, कुसुम वानखेडे, कमला राऊत,अल्का लकडे, शुभम जनबंधु, रश्मी ताडे,वैशाली आकोडे,मेघा ढबाले,भारती वानखडे, कांता मोंडे,लता गवई, आदि उपस्थित होते.

# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावतीच्या वतीने ICAIISD 2025 आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

महाराष्ट्र शासनाच्या स्वायत्त संस्था असलेल्या शासकीय अभियात्रिकी महाविद्यालय, अमरावती ही शैक्षणिक सत्त्था केवळ अभियांत्रिकी शिक्षणापुरती मर्यादित न राहता संशोधन, नवोन्मेष, स्टार्टअप्स, आणि तंत्रज्ञानाच्या समाजाभिमुख उपयोजनासाठी सदैव कार्यरत आहे. याच प्रेरणेने महाविद्यालयाने यंदाही एका भव्य, उच्चस्तरीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले आहे. 2 International Conference on Artificial Intelligence Innovations for Societal Development (IC-IISD'2025) ही परिषद १९ व २० डिसेंबर २०२५ रोजी अमरावती येथे संपन्न होणार असून, ही परिषद Celebration Year 2025 आणि महाविद्यालयाच्या माहिती तंत्रज्ञान विभागाच्या रौप्य महोत्सवी वर्ष या अनुषगाने विशेष स्वरूपात साजरी केली जाणार आहे.

या परिषदेचे वैशिष्ट्य म्हणजे समाजोपयोगी कृत्रिम बुद्धिमत्ता संशोधनाला चालना देणारी सखोल चर्चा, आतरराष्ट्रीय सशोधन लेखाचे सादरीकरण, औद्योगिक व शैक्षणिक क्षेत्रातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन, तसेच नव्या संशोधकांना स्वतःला सिद्ध करण्याची संधी. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. आशिष महल्ले (General Chair, ICAIISD'2025) यांनी आवाहन केले आहे की, UG/PG चे विद्यार्थी, प्राध्यापक, तसेच औद्योगिक क्षेत्रातील तंत्रज्ञ व संशोधकानी १५ ऑगस्ट २०२५ पर्यंत आपले संशोधन प्रबंध (Research Paper)www.icaiisd25.gcoea.ac.in या संकेतस्थळावर ऑनलाइन सादर करावेत. यदा सादर करण्यात येणारे संशोधन लेख, Springer Nature या ख्यातनाम व नाभाकित आतरराष्ट्रीय प्रकाशन संस्थेच्या निवड प्रक्रियेनंतर, त्यांच्या नियतकालिकात (Journal) मध्ये प्रकाशित करण्यात येणार आहेत. ही एक अत्यंत प्रतिष्ठित आणि गुणवत्ताधारित प्रक्रिया असून, निवड झालेल्या लेखांना जागतिक स्तरावर मान्यता तसेच विस्तृत वाचकवर्ग मिळण्याची अमूल्य संधी प्राप्त होणार आहे, हे परिषदेचे मोठे आकर्षण ठरणार आहे.

# वाघाची कातडी विकणाऱ्या तिघांना अटक, चार वर्षांपासून होते फरार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

वाघाची शिकार करून कातडी विकणार्या टोळीतील तिघांना बुधवारी रात्री फ्रेजरपुरा पोलिसांनी मध्यप्रदेशातून अटक केली. अनिल भीमराव सरियाम (वय ३५), सुनील बसतीराम श्रीरामे (वय ३५ दोन्ही रा. कुंभीखेडा, ता. मुलताई,मध्यप्रदेश) आणि विजय साहेबराव बेले (वय २१, रा. भेंमडी ता. वरूड) अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. वरुड तालुक्यात सन २०२१ मध्ये काही शिकारी वाघाची कातडी विकण्याकरिता आले होते. तेव्हा वनविभागाने काही आरोपींना अटक केली होती. परंतु तीन आरोपी पसार झाले होते. तेव्हापासून वनविभागाचे कर्मचारी त्यांच्या शोधात होते. मागील चार वर्षापासून तिन्ही आरोर्षीचा कुठेच पत्ता लागला नाही. त्यामुळे वनविभागाने फ्रेजरपुरा पोलिसांना तिन्ही आरोपींचा वारंट जारी केला होता. दरम्यान फ्रेजरपुरा पोलीस तिन्ही आरोपींच्या शोधात असताना माहिती मिळाली की, तिन्ही आरोपी कुंभीखेडा लगतच्या गावातस्वतःचे नाव बदलवून बांधकामाचे काम करीत आहेत. माहिती मिळताच बुधवारी रात्री पोलिसांचे पथक मध्यप्रदेशला रवाना झाले आणि तिघांना अटक करून शहरात आणले. तसेच गुरुवारी न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने सुनील बेले याला वगळून दोघांना न्यायालयीन कोठडी सुनावली.

# अतिवृष्टीचे पैसे शेतकऱ्यांच्या खात्यात जमा व्हायला सुरुवात : विलास पाटील यांनी शेतकऱ्यांचा प्रश्न लावून धरल्याचे फलित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६वरूड**

मागील वर्षी ऑगस्ट सप्टेंबर दरम्यान अतिवृष्टीमुळे झालेल्या संत्रा पिकाच्या नुकसानीमुळे तालुक्यातील शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला होता. शासनाकडून नुकसान भरपाई जाहीर झाली असली तरीही ती अद्याप शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा न झाल्याने प्रचंड नाराजी होती. मात्र, या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेत सामाजिक कार्यकर्ते विलास पाटील यांनी वेळोवेळी प्रशासन आणि संबंधित खात्यांकडे पाठपुरावा केला. त्याचा सकारात्मक परिणाम म्हणून नुकतेच तालुक्यातील शेतकऱ्यांच्या खात्यावर नुकसानभरपाईचे पैसे जमा होण्यास सुरुवात झाली आहे. शासनाच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाने मंजूर केलेल्या निधीअंतर्गत या भरपाईची अंमलबजावणी करण्यात येत आहे. सुरुवातीला काही शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे जमा झाले होते उर्वरित लाभार्थ्यांच्या खात्यांमध्ये सुध्दा पैसे जमा व्हायला सुरुवात झाली असल्याचे प्रशासनाने सांगितले आहे. यासाठी बँक आणि महसूल प्रशासनामध्ये समन्वय साधण्यात आला आहे.शासनाच्या कोणत्याही योजनांचा खरा लाभ हा तेव्हा पोहोचतो जेव्हा स्थानिक पातळीवर लोकप्रतिनिधी किंवा सामाजिक कार्यकर्ते सक्रिय राहतात. विलास पाटील यांचे हे उदाहरण इतरांनाही प्रेरणादायी ठरू शकते.



**विलास पाटील यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा**

विलास पाटील यांनी शेतकऱ्यांना न्याय मिळावा यासाठी तहसील कार्यालय, पंचायत समिती, जिल्हाधिकारी कार्यालयात अनेकदा निवेदने दिली. त्यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातूनही शेतकऱ्यांच्या व्यथा मांडल्या. त्यांनी संबंधित खात्यांशी थेट संवाद साधत हा मुद्दा सातत्याने लावून धरला. यामुळे प्रशासनाला जाग येऊन निधी वितरणाची प्रक्रिया गतिमान झाली.

**शेतकऱ्यांमध्ये समाधानाची लाट**

शेतकऱ्यांच्या खात्यात नुकसानभरपाई जमा होत असल्याची माहिती मिळताच अनेक ठिकाणी समाधान व्यक्त केले जात आहे. विलास पाटील यांनी वेळोवेळी आमच्या अडचणी शासनापर्यंत पोहोचवल्या. त्यामुळेच आज आमच्या खात्यावर पैसे जमा होत आहेत. यासाठी आम्ही त्यांचे आभार मानतो, असे प्रतिपादन नितीन पेलागडे यांनी केले.

**उर्वरित शेतकऱ्यांसाठी प्रशासन सज्ज**


ज्या शेतकऱ्यांच्या खात्यात अद्याप पैसे जमा झालेले नाहीत, त्यांच्यासाठी महसूल प्रशासन विशेष मोहीम राबवून बँक खात्यांची पडताळणी करत आहे. कोणत्याही कारणाने रक्कम अडकली असल्यास ती लवकरात लवकर सोडवण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

# अमरावती विभागाला ६६ कोटी १९ लाखांची नुकसानभरपाई

## अवकाळीग्रस्त ५४ हजार ७२९ शेतकऱ्यांना दिलासा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

अमरावती विभागात एप्रिल व मे महिन्यात अवकाळी पाऊस, गारपीट या नैसर्गिक आपत्तीत सापडलेल्या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना राज्य सरकारने मदतीचा हात देत ६६ कोटी १९ लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे. यात ५४ हजार ७२९ शेतकऱ्यांच्या ३६ हजार १८९ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ही मदत असून नुकसानभरपाईच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.



एप्रिल व में या महिन्यात नैसर्गिक आपत्ती शेतकऱ्यांच्या पिकांवर आली व यात शेतकऱ्यांनी पिकविलेले पीक होत्याचे नव्हते झाले. अवकाळी पाऊस व गारपिटीने नुकसान करून सोडलेल्या अशा शेतकऱ्यांचे अश्रू पुसण्यासाठी राज्य सरकारने ३३७ कोटी ४१ लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. यात अमरावती विभागातील ५४ हजार ७२९ नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचा समावेश आहे. त्यांच्या ३६ हजार १८९ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ६६कोटी १९ लाख रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे, नैसर्गिक आत्तीच्या या निधीत अमरावती विभागातील एप्रिलमधील अमरावती, अकोला व बुलढाणा या तीन जिल्ह्याचा समावेश असून ५ हजार १५ शेतकऱ्यांच्या ३२४३ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ५९६ लाख रुपयांच्या मदतीची तरतूद करण्यात आली आहे. तर मे मध्ये मात्र अमरावती विभागातील पाचही जिल्ह्याचा समावेश असून एकूण ६० कोटी २२ लाखाचा मदत निधी मंजूर करून तो ४९ हजार ७१४ शेतकऱ्यांच्या ३२ हजार ९४६ बाधित क्षेत्रासाठी मिळणार आहे.

**बँकांनी निधी कर्जात कपात करू नये**

नैसर्गिक आपत्तीमध्ये शेतकऱ्यांना दिलेला हा मदत निधी बँकांनी कर्ज खात्यात किंवा अन्य वसुलीसाठी वळती करू नये, यासाठी सर्व बँकांना तशा सूचना निर्गमित करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी करतील, असे आदेशात म्हटले आहे.

**कोणत्या जिल्ह्यासाठी किती निधी?**

अमरावती विभागातील में मध्ये अकोला जिल्हयातील ११,०२६ शेतक-यांच्या ७५९३ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी १३ कोटी १७ लाख, यवतमाळमधील ६७५४ शेतकऱ्याच्या ४९०६ हेक्टर बाधित क्षेत्राला ८ कोटी ३४ लाख, बुलढाण्यातील ११०८६ शेतक-यांच्या ६५९९ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ११ कोटी ३८ लाख, वाशीमकरिता ९३८ शेतकऱ्यांच्या ९७२ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी १ कोटी ६६ लाख व अमरावती जिल्ह्याकरिता एप्रिल महिन्यात ११७४ शेतकऱ्यांसाठी १७७ लाख व मे महिन्यातील १९ हजार ९१० शेतकऱ्याऱ्यांसाठी २५ कोटी ६६ लाखांची मदत निधी जाहीर करण्यात आला आहे.

# ओव्हरटेक दरम्यान एस.टी. टपाल बसला अपघात - जीवितहानी टळली

## धारणी-परतवाडा मार्गावरील मांगीया-कोलकास दरम्यान घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६धारणी**

अमरावतीहून धारणीकडे येणारी आणि टपाल वाहतुकीसाठी प्रसिद्ध असलेली एस.टी. महामंडळाची टपाल बस (क्र. MH 20 CG 3860) शनिवारी अपघातग्रस्त झाली. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही.

ही बस सकाळी ६ वाजता अमरावतीहून निघून सुमारे १०:३० वाजता धारणी बसस्थानकात पोहोचली. प्रवासी व टपाल साहित्य उतरवल्यानंतर ती बस पुन्हा ११ वाजता अमरावतीकडे रवाना झाली. मात्र, दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास मांगीया ते कोलकास मार्गावर समोरून येणाऱ्या एका कारमुळे ओव्हरटेक करताना बस रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडांच्या फांदीला धडकली.




या अपघातात बसच्या समोरची काच फुटली. बसचालक आणि वाहक यांना समोर बसले असल्यामुळे मोठा धक्का बसला, मात्र कोणतीही शारीरिक इजा झाली नाही. बसमध्ये प्रवास करणाऱ्या प्रवाशांनाही कोणतीही इजा झाली नसल्याचे स्पष्ट झाले आहे. तथापि, बसच्या समोरील भागाचे मोठे नुकसान झाले असून एस.टी. महामंडळास आर्थिक फटका बसला आहे.

# वर्ध्यात भीषण अपघाताचा थरार; बस आणि ट्रेलरची जोरदार धडक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६वर्धा**

वर्ध्यात हिंगणघाट मार्गावर बस आणि ट्रेलरची जोरदार धडक झाल्याची घटना घडलीये.ङ्गया भीषण अपघातात १०-१२ प्रवासी जखमी झाले आहेत. तर चालकही गंभीर जखमी झाला आहे.वर्ध्यातील धोत्रा चौकातील पेट्रोलपंपाजवळ ट्रेलरने बसला धडक दिली.ङ्गपोलिस आणि नागरिकांनी मिळून जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल केले.

For Add Contact
8605948853

# त्या तरुणाचा वाघाच्याच हल्ल्यात मृत्यू

## बारुखेडा जंगलातील हरविलेल्या युवकाचा मृतदेह सापडला : ठाणेदार अवतारसिंग चव्हाण यांच्या नेतृत्वात शोध मोहिमेला यश,आमदार केवलराम काळे यांनी तत्काळ मदतीचे दिले निर्देश



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६धारणी**

काही दिवसांपूर्वी झील्पी गावातील आदिवासी युवक रामसिंग रामचंद्र मावसकर हा बारुखेडा गावानजीकच्या जंगलात बेपत्ता झाला होता त्या युवकाचा मृतदेह अखेर पोलिस व वनविभागाच्या संयुक्त शोध मोहिमेनंतर सापडला. दुर्दैवाने, या युवकाचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

> नातेवाईकांच्या तक्रारी नंतर रामसिंग चां जंगल भागात दररोज शोध सुरूच होता शुक्रवारला त्याचा मृतदेह बारू खेडा जंगलात आढळून आला त्याची ओळख त्याच्या सोबत असलेल्या दुसऱ्या युवकाने त्याच्या अंगातील कपडे व टॉर्च वरून पटविली आहे
> **अवतारसिंग चव्हाण, पोलीस निरीक्षक धारणी.**

धारणी तालुक्यातील झिल्पी गावातील रामसिंग रामचंद्र मावसकर हा युवक हा १३ जुलै रविवार ला जनावरे घेवून जंगल मार्गाने अकोट जातो असे घरी सांगून निघून गेला होता तो आठ दिवसानंतर ही घरी न आल्याने त्याच्या दोन भावंडांनी धारणी पोलिसात तो बेपत्ता आहे व त्याला वाघाने ठार केल्याची तक्रार दिली होती त्या तक्रारी ने वाघाच्या हल्लूयाबाबत खळबळ उडाली होती याबाबत पोलीस निरीक्षक अवतारसिंग चव्हाण यांच्या नेतृत्वात शोध मोहिम हाती घेण्यात आली होती. स्थानिक वनविभागाच्या अधिकाऱ्यांनीही तातडीने मदत केली. सलग काही दिवस शोधकार्य सुरु असतानाच दहा बारा दिवसांनंतर शुक्रवारी जंगलात त्या युवकाचा मृतदेह आढळून आला. मृतदेहाची स्थिती पाहता वाघाच्या हल्लूयात त्याचा मृत्यू झाल्याचे संकेत मिळाले. दरम्यान, ही घटना समजताच आमदार केवलराम काळे यांनी वनविभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधत पीडित कुटुंबीयांना तातडीची आर्थिक मदत देण्याचे निर्देश दिले. तसेच, जंगल परिसरात मानव-वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी उपाययोजना करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, स्थानिक नागरिकांनी जंगल परिसरात सतर्कतेने वावर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. वनविभागाकडून परिसरात गस्त वाढवण्यात आली आहे.

# अमरावती जिल्ह्यात ४८ तासांपासून संततधार; अनेक शेतात साचले पाणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

अमरावती जिल्ह्यामध्ये मागील ४८ तासांपासून संततधार पावसाला सुरुवात झाली असून संपूर्ण जिल्ह्यात पावसाचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. परिणामी जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले असून शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.



या मुसळधार पावसामुळे खरीप हंगामातील तूर, सोयाबीन आणि कापूस या मुख्य पिकांना मोठा फटका बसला आहे. अनेक गावांमधील शेतीक्षेत्र पूर्णपणे जलमय झाले असून उभ्या पिकांचे उत्पादन धोक्यात आले आहे. विशेषतः भातकुली तालुक्यातील गौरखेडा गावात शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. पाणी साचून राहिल्यामुळे शेतजमिनींची माती खरडली गेली असून, पिकांची मुळे कुजण्याची शक्यता वाढली आहे.शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण असून, सरकारकडून नुकसानीच्या तातडीच्या पाहणीसह मदतीची मागणी होत आहे. मागील वर्षांपासून शासनाने शेतकऱ्यांना पीक विमा काढण्याचे आवाहन केले होते. त्यामुळे बहुतांश शेतकऱ्यांनी पिक विमा घेतलेला आहे. मात्र आता प्रत्यक्षात नुकसान झाल्यानंतर विमा भरपाई तातडीने मिळावी, अशी जोरदार मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.अवकाळी संकट आणि शासनाच्या यंत्रणांची गती यामध्ये समतोल आवश्यक असल्याचे जाणकारांचे मत आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार जिल्ह्यात अजून काही दिवस पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासनाने शेतकऱ्यांच्या नुकसानीची वेळेत पाहणी करून योग्य ती भरपाई द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.दरम्यान, अमरावती जिल्हा प्रशासन, कृषी विभाग व आपत्ती व्यवस्थापन विभाग यांची यंत्रणा सतर्क असून, संबंधित तालुक्यांमध्ये नुकसानग्रस्त भागांचे पंचनामे लवकरच सुरू करण्यात येणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांकडून मिळाली आहे.

## शिरसगाव कसबा येथून वाहणाऱ्या मेघा नदीला पूर



अमरावती जिल्ह्यात कालपासून संततधार पाऊस सुरू असून अनेक भागात जनजीवन विस्कळीत झाले आहे. विशेषतः चांदूरबाजार तालुक्यातील शिरसगाव कसबा परिसरात पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे.शिरसगाव कसबा येथून वाहणारी मेघा नदी तुडुंब भरून वाहत असून परिसरातील नदीकाठच्या गावांमध्ये प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला आहे. नागरिकांनी आवश्यक ती काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.मेघा नदीला आलेल्या या पूरामागचे प्रमुख कारण म्हणजे मध्य प्रदेशातील सातपुडा पर्वतरांगांमध्ये मागील २४ तासांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे नदीच्या पाणीपातळीत मोठी वाढ झाली आहे. परिणामी, नदीकाठच्या शेतजमिनी, रस्ते आणि काही घरे जलमय होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.प्रशासनाने आपत्ती व्यवस्थापन पथक सज्ज ठेवले असून मदत आणि बचाव कार्यासाठी तयारी सुरू आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत सूत्रांकडून मिळणाऱ्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# 'ई-लायब्ररी'चे सरन्यायाधीशांच्या हस्ते लोकार्पण; वकील आणि कायदेक्षेत्राला नवी दिशा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती,**

अमरावती जिल्हा वकील संघातर्फे आज 'स्व. ॲड. टी. आर. गिल्डा स्मृती ई-लायब्ररी'चे अमरावती जिल्हा व सत्र न्यायालय इमारतीत उद्घाटन सिपना इंजिनिअरींग कॉलेज, बडनेरा रोड येथे करण्यात आले. सरन्यायाधीश, न्या. भूषण गवई यांच्या हस्ते या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे लोकार्पण करण्यात आले.



सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती न्या. अतुल चांदुरकर, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती न्या. आलोक आराधे, मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाचे प्रशासकीय न्यायमूर्ती न्या. अनिल किलोर, दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती न्या. नितीन सांबरे, मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ तथा अमरावती जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती न्या. प्रविण पाटील, अमरावतीचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सुधाकर यार्लगड्डा, ज्येष्ठ अधिवक्ता जुगलकिशोर गिल्डा आदी यावेळी उपस्थित होते.

सरन्यायाधीश न्या. गवई म्हणाले, व्यावसायिक विस्तारीकरण झाले आहे. ई - हिअरिंग अशा विविध माध्यमातून नव तंत्रज्ञान आज न्यायदान क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावित आहे. आधुनिक काळात नवीन तंत्रज्ञानाचा वापर न्यायदान क्षेत्रात अत्यंत महत्त्वपूर्ण आहे .कायदेशीर अभ्यासाला आणि संशोधनाला गती देण्यासाठी उभारण्यात आलेल्या या अत्याधुनिक ई-लायब्ररीमुळे वकील तसेच कायदेविषयक अभ्यासकांना डिजिटल माध्यमातून अद्ययावत माहिती उपलब्ध होणार आहे. या ई-लायब्ररीमुळे कायदेशीर संदर्भ, निर्णय आणि लेख त्वरित उपलब्ध होतील, ज्यामुळे वकिलांना खटल्यांची तयारी करणे अधिक सोयीचे होईल. ड. टी. आर. गिल्डा यांच्या स्मृतींना उजाळा देत, त्यांच्या नावाने सुरू झालेली ही ई-लायब्ररी कायदेशीर व्यवसायातील नव्या पायंडा रचेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

न्यायदानाच्या प्रक्रियेत खूप बदल झाले आहे. इंटरनेट सुविधेमुळे कामकाजाचे स्वरूप बदलले आहे. यासाठी ई -लायबरी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. ई-लायब्ररीचा आपल्या कार्यक्षेत्रात उपयोग करून घ्यावा. नवीन पिढीतील वकिलांना याचा निश्चित फायदा होईल. वकिलांनी रोज वाचन करणे आणि ज्ञान अद्ययावत ठेवणे गरजेचे असते. 'वाचाल तर वाचवाल' यानुसार अशीलाला मदत करण्यासाठी पारंपारिक वाचन पद्धतीसोबतच ई - लायबरी निश्चितच मदतनीस ठरेल, असा विश्वास व्यक्त करून सरन्यायाधीश. न्या. गवई यांनी ई-लायब्ररीच्या गरजेवर आणि तिच्यामुळे कायदेक्षेत्रात होणाऱ्या सकारात्मक बदलांबाबत यावेळी समाधान व्यक्त केले. कारगिल दिनानिमित्त त्यांनी शहिदांचे स्मरण करून अभिवादन केले. ज्येष्ठ अधिवक्ता जुगलकिशोर गिल्डा यांनी इ लायब्रीच्या स्थापनेसाठी देणगी दिली आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अमरावती जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष ड. सुनील देशमुख यांनी केले. सूत्रसंचलन जिल्हा सरकारी वकील ड. परीक्षित गणोरकर आणि सहायक सरकारी वकील ड. सोनाली क्षीरसागर यांनी केले. आभार अमरावती जिल्हा वकील संघाचे उपाध्यक्ष ड. लांडे यांनी मानले.कार्यक्रमानंतर सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांचे अमरावती विमानतळ येथून प्रस्थान झाले. यावेळी आमदार रवी राणा, विभागीय आयुक्त श्वेता सिंघल, विशेष पोलीस महानिरीक्षक रामनाथ पोकळे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद, मनपा आयुक्त सौम्या शर्मा आदी उपस्थित होते.